वा-वा
नों-ह-६२४०

IRBK-0106240
IRBK-0106240

संग्रहालय

# सिंहगड

IRBK-0106240

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

IRBK-0106240

* * * * * * * * * * * * * *

[ प्रतापगडावरील भवानीमंदिर. शिवाजी देवीसमोर गुडघे टेकून बसला आहे. ]

**शिवाजी :** जगत्त्रयजननी, वेळोवेळीं मी माझं इच्छित तुला सांगितलं का पाहिजे ? तूं जाणतेसच कीं, तुझ्या कृपाप्रसादानें ह्या तुझ्या लीन दासाला हें अल्पसं महत्त्व प्राप्त झालं आहे. मायमाउली, तुझ्या कृपेची पांखर, हेंच ह्या शिवाजीचं पाठबळ. मग तूंच सांग, आज कोंडाण्यासारख्या अजिंक्य गडाबद्दल मासाहेबांनीं माझ्याजवळ मागणी केली आणि ती पुरी करण्याबद्दल तुझ्याकडून मला प्रोत्साहन मिळूं नये ? बोल, मायभवानी, माझ्या महाराष्ट्रजननी, ह्या तुझ्या अज्ञान लेकराला अभय देऊन मोकळी हो. [ देवीच्या गळ्यांतील हार तुटून पडतो, शिवाजी दचकतो, तोंच हिरोजी येतो. ] कोण ?

**हिरोजी :** मी हिरोजी, महाराज. कां महाराज, आज असे अगदीं देवीजवळ धरणं धरून कां बसले आहांत ?

**शिवाजी :** हिरोजी, माझ्या मायबोलीच्या मावळेमराठ्यांनीं, रक्ताच्या आणि प्राणांच्या मोलानें मायदेशाच्या मुक्ततेसाठीं रात्रीचा दिवस केला...

**हिरोजी :** आणि मायभवानीनें त्यांत आपणाला वेळोवेळीं यश दिलं. सोडला तीर वायां गेला, किंवा टाकलेला डाव उलटला, हें आपल्याला आठवत सुद्धा नाहीं.

**शिवाजी :** नव्या जोमानें, नव्या दमानें, दिलजमाई करणारे तुझ्यासारखे नवजवान, हिंदवी स्वराज्यासाठीं स्वतःचं शिर तळहातावर घेऊन दुश्मनाच्या तटबंदीवर टकरा देऊं लागले...

**************************************************

**हिरोजी :** आणि दुरभिमानानें धुंद झालेले दुश्मनही दांतीं तृण धरून आपल्या पायां पडणीस आले.

**शिवाजी :** त्या वेळीं ध्येयासाठीं आपण कशाची पर्वा केली नाहीं, किंवा कोणत्याही बाबतींत किंचित् माघारही घेतली नाहीं. आल्या प्रसंगाला शिताफीनें तोंड देऊन, दुश्मनांचीं थोबाडं रंगवीत होतों. पण आज...

**हिरोजी :** मग महाराज, आजच आपणांला असं काय वाटलं ? असं कोणतं जोखम शिरावर पडलं आणि तें पार पाडण्यासाठीं आपण असे चिंतातुर झालांत ? हिंदु धर्मासाठीं, गोब्राह्मणप्रतिपालनासाठीं आणि मायदेशाच्या बंधमोचनासाठीं, ज्यांनीं आपल्या पावलावर पाऊल देऊन प्रसंगीं आपल्यासाठीं प्राण दिले, तेच आपले दिलदार दोस्त...

**शिवाजी :** आजही, माझ्यासाठीं जीव देतील ह्याची मला पूर्ण खात्री आहे. पण हिरोजी प्राणांच्या मोलानेंही जिथें आजचं इच्छित साध्य होण्याचीं चिन्हं दिसत नाहींत, तिथें निष्कारण मोलाचे जीव मातीमोल करण्यांत काय फायदा ?

**हिरोजी :** महाराज, ह्या तुमच्या अंतस्थ आंदोलनाबद्दल माझ्या बुद्धीला कांहींच उलगडा होत नाहीं.

**शिवाजी :** हिरोजी, मासाहेबांनीं आजपर्यंत न मागितलेली अशी बिकट मागणी माझ्याजवळ केली आहे आणि ती सुद्धा साधीसुधी नसून तीन दिवसांच्या आंत, दिल्लीपतीच्या ताब्यांत असलेल्या अजिंक्य अशा कोंडाण्यावर मराठ्यांचं भगवं निशाण फडकवलं पाहिजे, अशी त्यांची आज्ञा आहे.

**हिरोजी :** महाराज, मासाहेबांच्या आज्ञेप्रमाणें तीन दिवसांच्या आंत कोंडाण्यावर भगवा ध्वज फडकणार नाहीं असं का आपणांला वाटतं ?

**शिवाजी :** हिरोजी, केल्यानंतर होणार नाहीं, असं जगांत कांहींच नाहीं. पण कोंडाण्याची अजिंक्य तटबंदी आपल्याला वाटते तशी सहजासहजीं हातीं लागेल, अशी जर तुझी कल्पना असेल, तर ती साफ चुकीची आहे.

**हिरोजी :** महाराज, महाराष्ट्रांतील मर्दमराठ्यांनीं, मनगटाच्या जोरावर जी मर्दुमकी आजपर्यंत जगाला दाखविली, ते मोलाचे मोती, ह्या ऐन कसोटीच्या वेळीं मातीमोल होतील असं कां तुम्हांला वाटतं ?

**शिवाजी :** नाहीं. हिरोजी, ह्यामागें – आतां – आणि ह्यापुढें शिवाजीच्या मनांत असलं विपरीत आलं नाहीं आणि येणार नाहीं. हिरोजी, माझा

******************************************************

प्रश्न माझ्या मर्दमराठ्यांच्या मर्दुमकीचा नाहीं, पण माझं मन मला खातं तें एकाच गोष्टीसाठीं आणि ती गोष्ट म्हणजे, कोंडाण्याच्या तटबंदींतील प्रत्येक दगडागणिक, प्रत्येक मराठ्याचे मातीमोल जीव मातीमोल होतील, तेव्हांच हिंदु धर्माचं भगवं निशाण कोंडाण्यावर मोठ्या दिमाखानें फडकेल.

**हिरोजी :** अरेरे ! महाराज, एवढ्यासाठीं तुमच्या जिवाला वाईट वाटलं ना ? महाराज, केवळ ध्येयासाठीं प्रसंगीं आखी जिंदगी मातीमोल मानणाऱ्या मराठ्यांना, मासाहेबांसारख्या राजमातेची, सबंध आयुष्यांतील एकच मागणी पुरी करण्यासाठीं, कोंडाण्याच्या तटबंदींतील प्रत्येक दगडा-गणिक जीव देण्यांत कमीपणा नाहीं, उलट देहसार्थकतेबद्दल आनंदच वाटेल. आपल्या मायभवानीचा कृपाप्रसाद, मासाहेबांचा पुण्यप्रद आशीर्वाद आणि आपल्या निष्ठावंत मराठ्यांचा प्रयत्नवाद, ह्या त्रयींच्या जोरावर, नुसता कोंडाणाच काय, पण त्रैलोक्याचीही सत्ता हिरावून घेऊं पण ध्येय सोडणार नाहीं.

**शिवाजी :** हिरोजी, माझ्या मर्दमराठ्यांचा प्रयत्न, किंवा कोंडाण्याची मासाहेबांची इच्छा ह्याबद्दल ह्या शिवाजीला कांहींच वाटत नाहीं, पण देवीनें दिलेला कौल सर्वांच्या सुरक्षिततेची खात्री देत नाहीं.

**हिरोजी :** हरकत नाहीं. सगळ्याच वेळा कांहीं आपण म्हणूं तशा येत नसतात. जो प्रत्यय येईल, तो सुद्धा आपल्या आगामी भवितव्याला जास्तच हितकारक ठरेल.

**शिवाजी :** हिरोजी, खरंच, तुझ्या बोलण्याचा जों जों विचार करावा, तों तों ह्या शिवाजीला एक प्रकारचं कुतूहल वाटतं. महाराष्ट्राच्या ह्या मौल्यवान खाणींत, तुझ्यासारखे अमोल हिरे मिळाले, म्हणूनच ह्या शिवाजीनें संकल्पिलेल्या स्वराज्यस्थापनेच्या इमारतीवर तुमच्या कर्तबगारीच्या जोरावर कळस चढण्याची वेळ अगदीं समीप आली आहे. चल. त्याच तयारीला लागूं—

## प्रवेश दुसरा

* * * * * * * * * * * * * * * *

[ रानांतून रस्ता : तानाजी व शेलारमामा ]

**शेलारमामा :** तान्या, बिगीबिगी म्हणतांना दिस चार घटकांवर आला कि रे ? अर, शिवबाला निवतण देयाला जायाचं, त्यांत तुला इतकी शरम

*************************************************

लागत्येय व्हय ? आरे लेका, ह्या शेलाराला काय पोरगे झाले न्हाइत, का त्यांच्या डोईला म्यां बाजगं बांधलीं न्हाई ?

**तानाजी :** तसं न्हाई मामा, पण मोठ्याच्या दारीं आपल्यावानी गरिबानं लग्नाचं निवतण देयाला जायचं, म्हंजी जरा शरमच लागते बगा. शिवाय शिवबा राजा...

**शेलारमामा :** हात् लेका ! आरे, शिवबा आतां राजा झालाया, आन् ह्येच्या आदुगर तुझ्या आंगाखांद्यावर हात टाकूनशानी आन् कांदाभाकरीची मेजवानी झोडूनशानी बेटा तुझ्यासंगं दुस्मनाशीं झुंज खेळून दमला. आतां राजा झाला तरी तो तुझी जिवाची दोस्ती भुलेल होय ?

**तानाजी :** पन माज्या रायाचं लगिन म्हणून, त्या भाग्यवंताच्या हातीं अक्षता देतांना. मला जें काय......

**शेलारमामा :** काय होईल तुला ? आन् त्याला केवढा आनंद वाटेल ! तुझ्यासारख्या जिवाच्या दोस्तानं, आपल्या ल्येकाचं लगीन मांडलेलं ऐकून त्या भाग्यवंतालाबी अस्मान ठेंगणं व्हईल, आन् तो थोरांचा थोर, आपला मोठेपणा इसरून, तुझ्या लाडक्या रायबावर आपल्या पुण्य आशीर्वादाच्या चार अक्षताबी टाकील.

**तानाजी :** समदीं माणसं वाटली मिठाळत्याल, अन् जिजाबाई तर मला......

**शेलारमामा :** आर मर्दाची माउली हाय ती. तुला निवतण द्येयाला आलेला बगुनशान्, तिच्याबी डोळ्यांतून मायेचे मोती गालांवर कोसळतील.

**तानाजी :** आन् त्याची उठाबस झाली तर बरं, न्हाई तर म्हनत्याल, लेकाच्या लगीनघाईत तान्याला माणसंबी दिसेनाशीं झालीं.

**शेलारमामा :** अरे व्हयरे दिवान्या – आतां बिगीबिगी—

[ ते जातात. *मागोमाग* सावजी व नेमाजी येतात.

**सावजी :** बघितलंस गड्या ? मालुसऱ्यांच्या रायाचं लगीन ठरलं मातर, तंव व्याहीविहिणींची धांदल आणि करवल्यांची दंगल सुरू झाली.

**नेमाजी :** आन् आमच्यावानी टोकऱ्यांची चंगळ बाजूलाच रहाली. आरे, लग्नाचा मांडव दिसला, म्हंजी ह्या करवल्या बकरीवानी चराया लागत्यात.

**सावजी :** आन् आपुन् ह्या बयांचं रुसनं फुगनं, आन् नटनं मुरडनं बगुनशान दिवसच्या दिवस घालवितों. तानाजीराव शिवबारायाचे मोठे सरदार, अन् जिवाचे दोसदार... तवा ह्या करवल्यांना इत्का माद चडलाया.

***************************************

**नेमाजी :** आन् हेरी आखा दिस शेण गोवऱ्या जमवितांना ह्यांना कोनबी इचारीत न्हाई. पण तीच लगीनसराई आली, का ह्या चिमण्या लागल्या चिंवचिंव कराया.

**सावजी :** खरंच गड्या, ह्या रायबाच्या लग्नांत माज्या बानं माज्याबी लग्नाचा बार उडवून दिला असता, तर त्या रायबावानी म्यापन न्हवरा म्हून मिरवलों असतों न्हाई का ?

**नेमाजी :** कशाला ? माजं लगीन झालं म्हून गांवाला सांगायला व्हय ?

**सावजी :** आरे, पण माजा बा किती दळभद्री. तो म्हनतुया, मनगटाची मर्दुमकी दाखविल्याबिगर, लग्नाची वार्ताच बोलायची न्हाई.

**नेमाजी :** आन् माझ्याबी बाचा त्योच चक्रमपना नडतो ना. आरे, उद्यां आपण मर्दुमकी गाजवूनशान् आलोयात, तर दारांत आरती घेऊन येयाला कोन हाई ?

**सावजी :** तीच बायको असली, तर हां हां म्हनतां अवसानानं आम्ही दुस्मनांवर तुटून पडलों असतों. मंग काय झाल्या असत्या जखमा त्या झाल्या असत्या.

**नेमाजी :** आन् मऊ हातांनीं बांधाया आपल्या बायका होत्याच कीं.

**सावजी :** आन् बायकोचा हात जखमेला लागला, म्हंजी मग दवापानी बी नको.

**नेमाजी :** पन् बायको असती तर— [ रायबा येतो.

**रायबा :** आरे बायकोसाठीं रडतां व्हय...? मर्द मराठे आपुन आन्...

**सावजी :** तें समदं गड्या खरं. तुझा बा मरद आन त्याचा तूं लेक, फसाफसा बायका तुला मिळत्याल...

**नेमाजी :** आन् राया, आमी तुजे दोसदार...? अरे राया, आतां तूं लग्नाचा नोवरा, बोलायलाबी म्हाग होनार.

**सावजी :** आन् बायको पदरांत पडली, म्हंजी मग आमच्याकडे बगनार बी न्हाई.

**रायबा :** आरऽ, बायको मला मिळणार, आन् तुमी काय मुंजाबा व्हानार व्हय ? आरे, आज माजं लगीन झालं, उद्यां माज्यामागून तुमचींबी होतील. आरे, मर्दांचे बच्चे तुम्ही, काय बांगड्या भरल्याती व्हय ?

************************************************

**नेमाजी :** आरे, पन तुज्यावानी आमच्याबी डोसक्याला आमच्या बानं बासगं बांधलीं असतीं...

**सावजी :** तर आमी बी समांदलों आसतों, रायबावानी आमच्याबी मनगटांत पानी हाई.

**नेमाजी :** पन आतां बायलेला घेऊनशान् तू गांवभर घोड्यावरून मिरवणार—आन् आमी...

**सावजी :** राया बायलेला घेऊन कसा मिरवतोया, तें बगत -हानार.

**रायबा :** बगा, भाजी मस्करी करायचे तुमचे दिवस हाइत्, पन गड्यांनो, एक दिस माज्यायानी आपुन बी बायलेला घेऊन गांवभर वरात काढाल.

**सावजी :** आनि आतां आपुन पराक्रम केल्याबिगर बायको न्हाई मिळायची. तीच आपुन नशिबाची लढाई जितली का आपली का बाईल थयथय नाचत आलीच.

**नेमाजी :** मग आमीबी सांगूं आमच्या म्हाताऱ्याला, मर्दुमकी गाजविल्यावर तूंच कशाला बायको करून द्यायला पाहिजेस ? काय राया ?

**रायबा :** तुमच्या मनगटांत काय जोर न्हाई ?

**सावजी :** आरे, एक सोडून छप्पन बायका आनूं या. नला, आदुगर रायाचं लगीन कसं गाजतं तें तर बगूं या.

**नेमाजी :** चार माणसांत पोवाडाबी एक म्हणून दावूं या. [ जातात.

## प्रवेश तिसरा

* * * * * * * * * * * * * *

[ रायगडावरील निवान्त स्थळ ]

**शिवाजी :** घडीघडीनें जसा काळ लोटतो आहे, तसा कोंडाण्याविषयींचा माझा घोर दुणावतच जातो आहे. मासाहेबांच्या इच्छेप्रमाणें माझ्या हातून जर त्यांची इच्छा पूर्ण झाली नाहीं, तर त्या मायमाउलीच्या पोटीं जन्म घेऊन मीं तिची व्यर्थ कूस शिणविली, असं म्हणून सारं जग माझी छीःथूः करील. तळहातावरच्या फोडाप्रमाणें अनेक आपत्तींशीं झगडून ज्या माउलीनें मला ह्या स्थितीला आणून पोचविलं, त्या माझ्या माउलीची इच्छा आणि ती सुद्धा माझ्या हिताची—[ शिपाई येतो ] काय आहे रे ?

**शिपाई :** बाहेर मालुसरे आणि शेलारमामा आले आहेत.

*********************************************************

**शिवाजी :** कोण तानाजी आणि शेलारमामा ? जा, त्यांना आंत पाठवून दे. [ तो जातो. ] योगायोग म्हणतात तो असा. कोंडाण्यावर हिंदु धर्माचं भगवं निशाण फडकविण्याची बिकट कामगिरी, माझ्या निधड्या छातीच्या तानाजीविना कुणालाच पार पडणार नाहीं आणि म्हणूनच मायभवानीनें त्याला आपल्या पायांनीं माझ्या दारीं आयताच ओढून आणला. [ तानाजी व शेलारमामा येतात. ] या मामा, ये तानाजी...कां मामा, इतक्या तांतडीनें कां येणं केलं ?

**शेलारमामा :** तुझ्याच पायांपाशीं.

**शिवाजी :** अहाहा ! मामा, भवानीनेंच तुम्हांला बुद्धि दिली आणि माझी अर्धी अधिक चिंता दूर झाली. खरोखरीच त्या मायभवानीला काळजी.

**तानाजी :** आपणांला काळजी ? आन् ती कसली ? राजे, स्वराज्यसंकल्पाचं वरुत हातीं धरल्यापासून, तों ह्या वख्तापर्यंत, जीवाची आस सोडून हा स्वराज्याचा सवतासुभा उभा केला, रातवेरात मानली न्हाई, का पोटापाण्याची पर्वाभी केली न्हाई. आन् आजच्या घडीला, त्याच ह्या आपल्या जिवाच्या जिगरदोस्तांजवळ आपण आपली मनाची रुखरुख बोलून दाखवीत नाहीं ?

**शेलारमामा :** आरे राजा, तुजं त्वांड उतरलेलं बघुनशान् कैसान् केस पांढरे झालेल्या ह्या म्हाताऱ्यालाबी अक्षी येड्यावानी झालंया. माज्या मराठ्यांच्या लाडक्या राजा, त्वां आपलं मनचं गुपित ह्या म्हाताऱ्याजवळ बोलूं नये व्हय ?

**शिवाजी :** मामा, माझ्या मावळमराठ्यांची माझ्यावरील निःसीम श्रद्धा आणि उत्कट प्रेम ह्यांमुळें माझा मीच क्षणाक्षणानें आपल्याला विसरून जातों. मामा, काळ्याचे पांढरे केलेलीं माणसं तुम्ही, तुमचीं मुलंही माझ्याहून मोठीं असतील. तानाजी, आरंभापासून माझा जिवाचा जिगरदोस्त तूं, जिवाची जी गोष्ट मानली, ती तुला कधीं सांगितली नाहीं, असं झालं आहे का ?

**शेलारमामा :** मग म्यां म्हणतूया, आजच असा येड्यावानी काय बरळतुयास ? धोरणी गडी तूं, तुझ्या पाटीलाबी दुस्मनाचे पाय दिसत्यात, आन् आजच असा कोणत्या कारणानं बाकचतुया ?

**शिवाजी :** मामा, तुम्हांला माहीतच आहे कीं, जगांत मातृऋणासारखं ऋण नाहीं आणि त्यांतल्या त्यांत माझं मातृऋण इतर मातांहूनही निराळं आहे. मातेच्या इच्छेसाठीं सोळाशें राण्यांचा त्याग करून बैरागी बनणारा गोपीचंद,

**************************************************

इतका प्रतापी राजा, पण केवढं त्यानें आपल्या आईसाठीं दिव्य केलं आणि मलाही प्रतापी म्हणून आजूबाजूची दुनिया ओळखीत असतांना, मी जर माझ्या मासाहेबांसाठीं कांहीं केलं नाहीं, तर इतरांची गोष्ट राहूं देच, पण प्रत्यक्ष तुम्ही माझे जातभाई मला काय म्हणाल ?

**तानाजी :** राया, कां असं जिवाला लावून घेतोस ? आपल्या तोंडच्या शब्दांनीं ह्या चाकराच्या आंतड्याला कां पीळ पाडतोस ? तूं मनसुबा केला – आन् तो ह्या चाकराकडून वायां गेला, असं कधीं झालं हाई का ? मग बोल, काय असेल तें दिल खुला करून सांग.

**शिवाजी :** मामा, पावलागणिक माझ्या मोलाच्या मर्दांना संकटाच्या खाईत कशी उडी घालायला सांगूं ? माझ्या मावळमराठ्यांच्या कधींही न फिटणाऱ्या ऋणाचा माझ्या शिरावर इतका भार झाला आहे कीं माझ्या कातड्याचे जोडे करून तुमच्या पायांत घातले, तरी ह्या जन्मीं मी तुमचा उतराई होणार नाहीं.

**तानाजी :** अरेरे, राया, काय बोललास ? कसलं विष ओकलास ? तुझ्यासारखा नायक, आमच्या धर्माला आणि आयावहिणींच्या इज्जतीला बचावण्यासाठीं जर जन्मास आला नसता, तर ह्याच महाराष्ट्रांत मराठ्यांच्या मंदिरांऐवजीं मुसलमानांच्या मशिदी दिसल्या असत्या, भर दिवसा गाईंच्या माना तुटल्या असत्या आणि आमच्या आयावहिणींना ह्या दुश्मनांनीं आपल्या बटकी बनविल्या असत्या.

**शेलारमामा :** वाईटांतून चांगलं तूं दावलंया, आन् आज आमच्याच सामनी डोळ्यांतून आसवं काढतोस व्हय ?

**शिवाजी :** मामा, आसवं काढूं नको तर काय करूं ? तुमच्यासारख्या हजारों गोरगरिबांच्या झोंपड्यांवरच माझं राजेपण अधिष्ठित झालं आहे. आणि म्हणूनच म्हणतों, ज्या माझ्या मातृइच्छेकरितां हजारों सुवासिनींना वैधव्याच्या खाईत होरपळावं लागणार आहे.... अरेरे.... तो भीषण प्रसंग डोळ्यांसमोर उभा राहिला कीं आंतडं पिळवटतं. हजारों स्त्रियांचे, रमणविरहानें बाहेर पडणारे विलाप, सौभाग्यहीनतेनें पांढरीं फटफटीत दिसणारीं तीं माझ्या मायभगिनींचीं कपाळं ......

**तानाजी :** नाहीं राजा, महाराष्ट्रांतील मराठणी असल्या दिव्याला कधींच भ्याल्या नाहींत आणि ह्यापुढें भिणार न्हाईत. राष्ट्रोद्धाराकरितां येणारं

**************************************************

वैधव्य म्हणजे तें निरंतर सौभाग्य समजून, त्या आनंदानें जगायला तयार असतील.

**शेलारमामा :** म्हणून म्हनतुया, काय आज्ञा ती बोल वेगीन–

**शिवाजी :** मामा, गोष्ट साधीसुधी नाहीं; आलमगिरासारख्या कडव्या दुश्मनाबरोबर आपल्याला झुंज खेळायची आहे. माझ्या मासाहेबांची कोंडाण्यासारखा अजिंक्य गड जिंकण्याची इच्छा तीन दिवसांत पुरी करायची आहे. कारण त्या किल्ल्यावर साधासुधा किल्लेदार नसून, पन्नास हजार पठाणांच्या रिसाल्यासह बाटगा उदयभानू खडा पहारा करतो आहे, म्हणून म्हणतों...

**शेलारमामा :** बस तान्या, जिजामाईच्या आज्ञेम्होरं ल्येकाच्या लग्नाची तुला मातबरी वाटते व्हय? चल ल्येका, पहिलं कोंडाण्याचं लगीन लावूं या आन् मग रायाच्या लग्नाची वरात काढूं या.

**शिवाजी :** काय, तानाजीच्या लाडक्या रायाचं लग्न? आणि त्यांत माझ्या मासाहेबांच्या इच्छेचं विघ्न? अरेरे, काय झालं हें?

**तानाजी :** धनी, जिजामाउलीच्या इच्छेपुढं ह्या तानाजीला, रायाचं लगीन भारी न्हाई.

**शिवाजी :** अहाहा, स्वामिनिष्ठेनें बेभान झालेल्या स्वार्थसंन्याशा, आपल्या औदार्यानें शिवाजीला लाजविलंस. ये, माझ्या जिवाच्या जिगरदोस्ता, ह्या तुझ्या राजाला एकदा कडकडून भेट.

**तानाजी :** मायेच्या बोलांनीं दुश्मनालाबी दोस्त बनविणाऱ्या धन्या, ह्या तुझ्या पायींच्या पायिकाला तुझ्याविना कोणताच देव श्रेष्ठ नाहीं. [ पाय धरायला जातो तोंच शिवाजी वरच्यावर भेटतो. ]

**शिवाजी :** जा, तानाजी, मायभवानीचा कृपाप्रसाद, मासाहेबांचा पुण्यप्रद आशीर्वाद तुला यशाचाच वांटा देईल.

**तानाजी :** आपल्या पायींची पुण्याई पाठीशीं असल्यावर, म्या कुणालाबी भिणार नाहीं.

## प्रवेश चौथा

* * * * * * * * * * * * * * *

[ रस्ता ]

**नेमाजी :** कुठं नशिबानं गोता खाल्ला, अन् ह्या नेमाजीचा नेम थोडक्यांत चुकला. मनगटाची मर्दुमकी दावल्याबिगर माजा बा माज्या

********************************************

बोडक्याला बाजगं बांधीत न्हाई अन् म्हाताऱ्याला मर्दुमकी दावायचाबी वखत येत न्हाई. माज्या नशिबानं तसा लडाईवर जायाचा वख्त यायाला हवा व्हता, म्हंजी मंग म्हाताऱ्याला बी सांगितलं आसतं, आतां बग तुज्या लेकाची मर्दुमकी. [ सावजी येतो. ] आलास का दोस्ता ?

**सावजी :** आरे गड्या, पन म्यां म्हनतुया, तानाजीरायानं रायबाचं लगीन धरलंया, तो राया कुनीकडे मर्दुमकी गाजवायला गेला व्हता व्हय ! पन माज्या म्हाताऱ्याला वाटतंया माजा लेक नामर्दच हाई. पन म्यां म्हनतुया कोन मर्द हाई तो असा माज्या सामनी येऊं द्या, म्हंजी दावतोया त्याला तडाका.

**नेमाजी :** अन् माजा बा काय म्हनतुया, मर्दाई गाजवावी आमीं म्हाताऱ्यांनींच. आन् आपुन जवानांनीं काय चुडे भरावे व्हय ? गड्या सावजी, आपल्याला तरवार गाजवायची संधि लाभूं दे, म्हंजी असा पराक्रम करूं कीं ज्याचं नांव तें.

**सावजी :** धर मुंडी का उडव. जयभवानी, जय महिशासुरमर्दिनी म्हनुनशान समदं रन हालवून सोडूं या. समदं रन रक्तानं लाल करूं या.

**नेमाजी :** आरे, नव्या जुवानीचे जुवान गडी आपुन, आपल्याला बगुनशान आलमगीरबी थरथर कांपूं लागल. [ रायबा येतो ] आला गड्या आपला राया, लग्नाचा न्हवरा सजऊया बघ कसा तो ! पन राया, आमच्या आगुदर येकटा बाईल करतुयास, पन बरं न्हाई रे गड्या.

**रायबा :** आरे बाईल केली म्हंजी काय राजा होतो व्हय ? नेमाजी, माज्या बानं माजं लगीन केलेलं बगुनशान, तुमचा बा बी तुमचं येकयेकाचं वाजवून टाकील.

**सावजी :** आरे शान्या मानसा, आमचा बा काय तुज्या तानाजीरावावानी शाना हाय व्हय ?

**नेमाजी :** अक्षी उखड माथ्याचा. आन् राया, तूंच बग, आसा बा आसला म्हंजी लेक सोन्याचा गोळा झाला म्हून काय करनार ?

**सावजी :** त्याला वाटतं, पोराची बाईल घरांत घुसली, कीं पोर आपल्याला घराबाहीर घालवून देईल.

**नेमाजी :** आन् म्हून आमचा बा लगीन कराया कच्चरतुया. आन् तुजा बा लगीन कराया नाचतुया— [ सूर्याजी येतो.

**सूर्याजी :** राया, आज तुजं लगीन थंडावलं. शिवरायानं दादाला कोंडाण्याचं लगीन लावायला आज्ञा दिली हाय. शिवरायाची आज्ञा ती, आपल्याला मानलीच पाहिजे.

**सावजी :** म्हंजी रायाचं लगीन न्हायलं ?

**नेमाजी :** मंग वाईट काय झालंया ? समद्यांनींच घेऊं या तरवार आन् जाऊं या कोंडाण्यावर चालूनशान्.

**सूर्याजी :** जीते रहो पट्ठे. आपल्यावानी मराठ्यांचीच आज देशाला गरज आहे. आपल्या मर्दुमकीवर उद्यांचं यश अवलंबून आहे.

**सावजी :** लडाई अन् उद्यांच ?

**नेमाजी :** न्हाई, हरकत न्हाई, पन चार दिवस उशिरा असती तर तितकी आमालाबी मेहनत कराया गवसली असती.

**सावजी :** आन् तुमीबी बगतलं असतं आमच्या मनगटांतलं पानी.

**सूर्याजी :** तुमची मर्दुमकी पाहायाच मी आलों आहें. नुसतीं तोंडं बगाया न्हाई आलों.

**नेमाजी :** अहाहा ! काय गड्या नामी वखत आलाया. आय भवानीजवळ आमीबी तेंच मागत होतों.

**सावजी :** आतां आम्ही मर्दावानी लडणार—

**सूर्याजी :** दुस्मनाशीं झुंज खेळतांना तुम्ही पडलेत, तर मेल्यानंतरही तुमची मर्दुमकी जिती राहील.

**नेमाजी :** म्हंजी, आमी लडाईंत मरावं व्हय ? हत्, आरे आमी मरणार न्हाईच, आन् तुमच्या संगें आमी लडायला येणार तें मरायसाठीं न्हाई......

**सावजी :** हां, मरायसाठीं आमी लडणारच न्हाई. आमी लडणार जितायसाठीं. परान गेला तरी लडाईंत मरायचं आपल्या बाच्या हातूनबी होणार न्हाई.

**सूर्याजी :** अरे मर्दाच्या बच्चांनो, कोंडाणा किल्ला सर करायासाठीं उदयभानूसारख्या कडव्या रजपुताबरोबर झुंजायचं आहे. पन्नास हजार पठाणांना समोरासमोर सामना द्यायचा आहे.

**नेमाजी :** म्हंजी गड्या, रायाचं लगीन खरंच राह्यलं ?

**रायबा :** आरे राया मर्दाचा बच्चा आहे, लग्नासाठीं लडाईवर जायला रडायचा नाहीं.

**********************************************

**सावजी :** आन् आमी रडूं व्हय? आरे, तिगांनीं तिशीकडून करूं या मारा आन् लावूं या झेंडा.

**नेमाजी :** आन् मग मर्दाचे बच्चे म्हुन जाऊं या शिवरायाच्या मुजऱ्याला.

**सूर्याजी :** मग घ्या भवानीचं नांव आणि चला माझ्याबरोबर. शिवरायाची ती आज्ञा आहे आणि ती बरोबर पाळणं आपला वीरांचा धर्म आहे.

**सावजी :** पण अगुदर तुमांला सांगतुया, आम्ही लडनार ते राजापायीं न्हाई, आन् देशापायींबी न्हाई.

**नेमाजी :** आमी लडणार आमच्या रानीपायीं. काय राया?

**सूर्याजी :** अगोदर लडाईला बाहेर पडा आणि जिवंत परत आलेत तर मग लग्नाची लडाई करा. तुमच्यावर मी एक महत्त्वाची कामगिरी सोंपविणार आहे, समजलं? [जातो.]

**सावजी :** नेमाजी, गड्या आपला नेम चुकला रे चुकला.

**नेमाजी :** आतां तूरत लगीन ऱ्हाइलं बाजूलाच, आतां अगुदर ढाल बांध पाठीवर, आन् चाल रायासंगं तरवार घेऊन.

## पोवाडा

**रणवीर शूर सरदार, तानाजी वीर, मांडी घनघोर, युद्ध अनिवार, चल धांव घेऊं तरवार, रे जी जी जी ॥ १ ॥ कोंडाण्यावर करी चाल, रागानें लाल, आला संभाळ, सांगे दुस्मनाला। युद्धाचा डंका वाजविला रे जी जी जी ॥ २ ॥ जमविला मेळ मावळ्यांचा, थोरामोठ्यांचा, वृद्धपोरांचा, फडकला ध्वज हिंदूंचा, जयघोष करी शिवबाचा रे जी जी जी ॥ ३ ॥ थडकला वाद्यांचा गजर, झाला संचार, वीर झुन्जार, कितीक तय्यार, झाले लढण्याला। वदती हरहर महादेव बोला ॥ जी जी जी ॥ ४ ॥ चला उठा वीर बंधुंनो, शूर मर्दांनो, जाऊं लढण्याला, करूं सर कोंडाण्याला। रे जी जी जी ॥ ५ ॥**

## प्रवेश पांचवा

[ कोंडाणा ]

**उद्यभानू :** शिवाजी ! मोगली मुलखांत मुसंड्या मारून, मोगल सरदारांना सतावून सोडणाऱ्या त्या शिवाजीच्या पुंडाईला आळा घालण्याकरितां, आमलगिरानें कोंडाण्यावर ह्या उदयभानूची नेमणूक केली आणि उदयभानू कोंडाण्यावर दाखल होतांच त्या जहांबाज लुटारूची पुंडाईही थंडावली. गनिमी गुंगाऱ्यानें दुश्मनाला शह देऊन, त्याची त्रेधातिरपीट उडविणारा हा चुव्वा, पहिल्याच तडाख्याला कोंडाण्याच्या अजिंक्य तटबंदीवर आपल्या शिताफीच्या टक्रा मारील असा अंदाज होता.

[ हिरोजी मौलवीच्या वेषांत येतो.

**हिरोजी :** आणि अजूनही तोच अंदाज कायम ठेवून सावधगिरीनें वागा किल्लेदारसाहाब. तो काफीर शिवाजी आतां ह्या वेळीं गप्प आहे, म्हणून आपणही निर्धास्त घोरत पडाल आणि आपली घमेंड जागच्या जागीं राहील.

**उद्यभानू :** मौलवीसाहेब, हा उदयभानू बादशाही दरबारांत प्रतिज्ञेचा विडा उचलून दक्षिणेंत आला आहे, तो ह्या बंडखोर शिवाजीच्या हुलकावण्यांना भीक घालण्याकरितां नव्हे. हा उदयभानू हाडाचा अस्सल रजपूत लढवय्या आहे.

**हिरोजी :** किल्लेदारसाहाब, अस्सल हिंदु होकर, आलमगिरासारख्या कडव्या इस्लामियाची ज्या वेळीं तुम्हीं ताबेदारी पत्करली, त्याच वेळीं तुमच्या अस्सलपणाची सबंध दुनियेंत किंमत झाली. सच्चा प्यार धर्म लाथाडून, अधिकार आणि वैभवविलासासाठीं परक्या इस्लामियांच्या मर्जीला पात्र होणारे तुम्ही, रजपूतच आहांत का ?

**उद्यभानू :** मौलवीसाहेब, मीं मुसलमानांची ताबेदारी पत्करली ती त्यांच्या दाढीला हात लावून नाहीं पत्करली. उदयभानूच्या कर्तबगारीनें ती ताबेदारी त्याच्या पायांशीं चालत आणली आहे. मुसलमानांची मोहब्बत पत्करली, म्हणजे माझ्या जातधर्माला तिलांजली दिली असं कां आपण समजतां ?

**हिरोजी :** किल्लेदार, कर्तबगार झालांत तरी ज्या वेळीं मुसलमानांची मोहब्बत पत्करलीत त्याच वेळीं तुम्ही तुमच्या धर्माला आणि तुमच्या जातभाईंना पारखे झालांत. शिवाजी आपला दुश्मन असला, तरी त्याची आमलगिराजवळची तेढ, त्याच्या धर्मासाठीं आणि जातभाईंच्या रक्षणासाठीं आहे आणि आजच्या घडीला तुमची कर्तबगारी तुमच्या धर्माला मारक आहे.

*********************************************

**उदयभानू :** मौलवीसाहेब, आमलगिराच्या हद्दींत आमलगिराच्या धर्माचा प्रसार करणारे तुम्ही मौलवी आणि आमलगिराशीं उभा दावा धरून त्याला त्राहि भगवन् करून सोडणाऱ्या शिवाजीची थोरवी तुम्ही गातां ?

**हिरोजी :** किल्लेदारसाहाब, हिंदु होऊन आपल्या प्याऱ्या धर्मवादी शिवाजीच्या पारिपत्याला आपण आलांत म्हणूनच मी बोलतों आहें. किल्लेदार, मला माझा धर्म प्यारा आहे, धर्मबांधव प्यारे आहेत, तसं तुमच्याजवळ आपुलकीच्या स्वाभिमानाचं कांहींच वारं दिसत नाहीं. ताबेदारी झाली, तरी जातधर्माचा विसर कधीं कुणाला पडला आहे का ?

**उदयभानू :** नाहीं. मौलवीसाहेब, जातगोताचा प्रश्न नाहीं. मी आलमगिराचें अन्न खातों आहें ! खाल्ल्याघरचे वांसे मोजणारा मी नाहीं. मी निमकहराम कधींच होणार नाहीं आणि म्हणूनच जातधर्मावर लाथ मारून हा उदयभानू शिवाजीबरोबर दंड थोपटून उभा राहिला आहे.

**हिरोजी :** किल्लेदार, अफझुलखानासारखा हत्तीच्या बळानें चाल करून आलेला सरदार जागच्या जागीं गारद झाला, सिद्दीजौहारसारखा समशेर-शिकंदर दांतओठ चावीत परत गेला हें आपल्याला माहीत असेलच.

**उदयभानू :** मौलवीसाहेब, दुश्मनाच्या आटोक्यांत आपण होऊन चालून गेल्यानंतर उपाय हरला तर नाइलाज आहे, पण हा उदयभानू कोंडाण्याच्या अजिंक्य तटबंदीवर, जागता पहारा ठेवण्यासाठीं डोळ्यांत तेल घालून पन्नास हजार नागव्या समशेरींनिशीं खडा आहे हें आपण विसरलांत ?

**हिरोजी :** किल्लेदार, आमलगिराचे आश्रित आम्ही, त्यांचं तुमचं हित तेंच ह्या गरीब मौलवीचं हित. म्हणून म्हणतों, कोंडाण्याच्या तटबंदीवर पन्नास हजार नागव्या समशेरींचा खडा पहारा ठेवतात, तरी काफीर मराठ्यांची ही पायवाट आहे. गडावरील खांचा खोंचा त्या बिलंदर काफरांना पूर्ण माहीत. ह्याकरितां ते कसे कुणीकडून तुमची त्रेधा उडवतील ह्याची आपल्याला दादसुद्धा लागणार नाहीं.

**उदयभानू :** ह्या बहादूर उदयभानूची त्रेधा उडवायला, त्या दगाबाज लुटारूला दुसरा जन्म घ्यावा लागेल. दुश्मनाला जाणूनबुजून वाट देऊन स्वतःची मान फासांत अडकविण्याइतका हा उदयभानू दूधखुळा नाहीं. मौलवीसाहेब, गडाच्या तीन बाजूंना जागता पहारा आणि चौथी बाजू निसर्गनिर्मित अजिंक्य ठेविली आहे. तटापासून पांचशें हात तुटलेला कडा दुश्मनाला भीतीचा बागुलबोवा दाखवीत आहे.

**************************************************

**हिरोजी :** किल्लेदारसाहेब, आपण खरे कसलेले लढवय्ये आहांत. कोंडाण्याच्या रक्षणाबाबत आलमगिरानें तुमची केलेली योजना, खरोखरच लाखांत एक आहे.

**उदयभानू :** म्हणूनच तुम्हांला छातीठोकपणानें सांगतों, कोंडाण्याच्या अजिंक्य तटबंदीवर दिमाखानें टकरा मारणारा कोण तो दुश्मन येऊं दे, कीं पहिल्याच धडाक्याला एका सरबत्तीवर त्याला सपशेल झोंपवला नाहीं तर ह्या उदयभानूचं नांव सांगणार नाहीं.

**हिरोजी :** जीते रहो पठ्ठे, परवर दिगार तुम्हांला मदत करो.

**उदयभानू :** घमेंडीनें चालून येणाऱ्या दुश्मनांच्या मनगटाला मनगट भिडवून, आलमगिराचं हिरवं निशाण तटावर फडकत ठेवणं हाच ह्या उदयभानूच्या कर्तबगारीचा दस्तुर आहे. त्या काफर शिवाजीला, ह्या उदयभानूचं असं आव्हान आहे कीं खरा मराठा जवान असशील, तर ह्या उदयभानूच्या समशेरीला समशेर भिडवून, आपल्या कर्तबगारीनें गडावर मराठ्यांचं भगवं निशाण फडकवशील. पण मौलवीसाहेब, ती कुवत त्या लुटारू शिवाजीला नाहीं. समोरासमोर उदयभानूच्या समशेरीला समशेर भिडविण्याची त्याची हिंमतच नाहीं.

**हिरोजी :** असं असेल तर महाराष्ट्रांत अजिंक्य म्हणून, आलमगिराच्या दरबारांत आपल्याला मोठी मानाची जागा मिळेल आणि तमाम मुसलमान म्हणेल कीं, " दख्खनके शेर एकही किल्लेदार उदयभानू है. "

**उदयभानू :** मौलवीसाहेब, पाक परवर दिगारचे तुम्ही सच्चे खिदमतगार आहांत. तुमच्या तोंडचे शब्द खरे होवोत आणि तो खुदाताला तुम्हांला सहीसलामत राखो.

**हिरोजी :** जरूर. आपण नेकीचे नेकदार पायीक आहांत ! आलमगिराचे विश्वासू किल्लेदार आणि सामन्याचे शेर लढवय्ये आहांत. तुमच्या तरवारीचं टोंक म्हणजेच मूर्तिमंत विजयाची खातरजमा. पण लक्षांत ठेवा, काळ वेळ सांगून येत नाहीं. [ जातो.

**उदयभानू :** फिरून जातांनाही हा मला बजावून गेला. हा खरोखर मौलवी आहे कीं मौलवीच्या वेषानें उदयभानूच्या काळजाचा भेद काढणारा, त्या काफीर शिवाजीचा हेर आहे ? आणि असला, तरी ह्या उदयभानूचा साडेतीन हात देह उभा आहे तोंपर्यंत तो कुणालाच भीक घालीत नाहीं.

---

म. ग्रं. सं. पुणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क. ............. नों. दि. ..............
वि. ..................... क. ....................

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

* * * * * * * * * * * * * *

[ तानाजी प्रवेश करतो. ]

**तानाजी :** जिजामाईची इच्छा आन् शिवरायाची आज्ञा आन् ती पार पाडण्याची भवानीनं मला आणून दिलेली सोन्याची संधि. जिजामाउलीच्या इच्छेकरितां तानाजीच्या ताज्या दमाच्या मर्द मावळ्यांची कोंडाण्यावर धाड. अभिमानशून्य उदयभानूला मराठ्यांच्या तरवारीचं पाणी दाखवायची सोन्याची संधि. तानाजीची आतांपर्यंतची हयात शिववाच्या पायांची पायकी करण्यांत गेली आणि आईभवानी, ह्या जिवाचा शेवटही शिवरायाच्या पायांजवळच होऊं दे. [ शेलारमामा येतो.

**शेलारमामा :** आरे गड्या, ह्यो काय इच्यार करायचा वख्त व्हय ? दिल्या मुदतींत गड मासाहेबांना सर केल्याचं समादलं न्हाई तर त्यो शिववा काय करील ठावं हाई ? आतां आदुगर इशारतीचीं शिंगं फुंकून आपल्या मर्दांना कोंडाण्याच्या पायथ्याशीं एकत्र गर्दी करून सोडाया सांग.

**तानाजी :** मामा, तान्या झाला तरीबी त्यो तुमचाच भाचा हाई. भवानीच्या कृपेनं, आन् आपल्या पायांच्या आशीर्वादानं त्याच कोंडाण्यावर दिल्या मुदतींत ह्या तानाजीनं झेंडा फडकविलेला तुमाला दिसल.

**शेलारमामा :** लेका तान्या, तूं मर्दाचा बच्चा हाईस, म्या कुटे न्हाई म्हनतुया ? पन शान्या मानसा, समद्याच येळा कुटे सारख्या सांगून येतात व्हय ? मर्द गडी तूं, दुस्मनाबरोबर डावपेचानें चार हात करायचीबी तुझी हिकमत न्यारी हाई. पन म्यां काय म्हनतुया, वखत न्हाई उरला.

**तानाजी :** मामा, ह्या तानाजीचा डाव कधीं उलटून पडला हाई का ? शिकंदर दुस्मानांना जीक घेऊन पळायला लावणारे आपण हिंमती गडी, मग कोंडाण्याची कसली आली हाई कदर. फौज जय्यत तयार हाई, पन कोंडाण्यावर मूठभर मावळ्यांना पन्नास हजारांना तोंड द्येयाचा हाई.

**शेलारमामा :** तान्या, दुस्मनाच्या दरवाजावर हत्तीच्या बळानें धडका मारतोस, पन कोंडाणा तुज्याबी जवानीला येकदम नाहीं आवरणार.

*************************************************

**तानाजी :** मामा, हा तानाजी आपल्या लौकिकाला कधींच काळं फासून घेणार न्हाई. जिजामाउलीच्या इच्छेकरितां मी माझा जीव देईन, पण कोंडाणा आपलासा करीन.

**शेलारमामा :** तान्या, गेल्या जवानीच्या धमकीवर म्होरं बगाया जाशील, तर येकाद्या वख्ताला त्वांड फोडूनशान घेशील. कोंडाण्याची तटबंदी बाजूलाच ऱ्हायली, पण गडाच्यासाठीं उदयभानूवानी उमदा रजपूत, मिशांना पीळ भरून नागव्या समशेरीनें पहारा करतुया.

**तानाजी :** मामा, मी पण तुम्हांला मोठ्या अभिमानानं सांगतों कीं, उदयभानूप्रमाणें हा तानाजी सुद्धा आपल्या आईचं दूध पिऊन पोसला आहे. उदयभानूला त्याच्या शौर्याची घमेंड असली, तर हा तानाजी कांहीं आज नव्यानेंच लढाई खेळत नाहीं, कीं तानाजीची जवानी मातीला मिळाली नाहीं. मराठ्यांच्या मर्दुमकीचं भगवं निशाण कोंडाण्यावर फडकवीन, आन् मगच तुमचा भाचा म्हणून तुम्हांला रामराम करीन.

**शेलारमामा :** तान्या, त्येका ताज्या तडफेचा उमदा जवान तूं, पन संमदींच कामं समशेरीच्या टोकानें होतात व्हय ? कोन्या वख्ताला वांईच इचार बी कराया लागतुया !

**तानाजी :** मामा, तुम्ही काय म्हणतां तें मला समांदलं न्हाई असं न्हाई, पण त्याची तरतूद मी आगाऊच करून हिरोजी नाइकाला तिकडे पाठविला हाई. तो हेरगिरी करून मला भेटला कीं, हा तुमचा आवडता तान्या भीमवळानें कोंडाण्यावर तुटून पडलाच म्हणून समजा.

**शेलारमामा :** म्हंजी, त्यो शाना माणुस आजुन परतला न्हाई ? आर म्हणावं, आमी काय हेरगिरी केली न्हाई, का दुस्मनाच्या गोटांत घुसलों न्हाई ? आपली कामगिरी केवडी पडलीया, आन् वखत किती उरलाया ? काय करावं ह्या माणसाला — [ हिरोजी येतो.

**हिरोजी :** मामा, हिरोजी कोंडाण्यावर गेला तो मराठ्याच्या माणुसकीनेंच गेला होता. पण दुर्दैवानें यशाचा वांटा मिळायला पाहिजे तितका तावडतोब मिळाला नाहीं. शेवटीं राजांच्या बोलांचीच मला सत्यता पटली.

**शेलारमामा :** आन् म्या बी तान्याला तेंच सांगतुया. बरं, काय झालं ?

**हिरोजी :** मोठ्या मुष्किलीनें उदयभानूजवळ शिरकाव करून घेतला, पण त्यांत मला अनुभव निराळाच आला. उदयभानू स्वतः कधीं बेसावध

**************************************************

नसून गडाच्या तिन्ही बाजूंना त्यानें चौकीगणिक जागते पहारे ठेवले आहेत, मान्याच्या जागा रोखल्या आहेत. मोर्चेबंदी जय्यत आहे आणि स्वतः उदयभानूच्या दोन्ही डोळ्यांचा जागता पहारा आहे.

**शेलारमामा :** ऐक लेका, आपल्या धास्तीनें दुस्मन बी आतां किती शाने बनल्याती तें ऐक. तूं म्हणशील तशी धाड टाकाया आन् झुंज खेळाया लई कटीन होऊन बसलंया. बरं पन चालून जायाला एकबी बाजू खुली न्हाई ?

**हिरोजी :** मामा, चौथी बाजू खुली आहे, पण तटाच्या उंचीपासून अजस्र कड्यानें पांचशें हात उंचीचा विक्राळ जबडा पसरला आहे. आपल्या मराठ्यांचे तटाच्या दगडागणिक बळी पडतील, तेव्हांच आपले बेत तडीस जातील.

**तानाजी :** पर्वा न्हाई. हिरोजी, शिवरायासाठीं, मायदेशासाठीं ज्या मर्दांनीं पायकीला वाहून घेतलं, त्यांना असलं भयंकर दिव्य करायला कसलीच दिक्कत वाटणार न्हाई. जगायचं तें देशासाठीं, आन् मरायचं तें बी देशासाठींच. चला, इशारतीची नौबत वाजवा आणि समद्या मावळ्यांना मोठ्या सावधगिरीनें गडाचा पायथा गांठायला सांगा.

**हिरोजी :** पण किल्ल्यावर चाल कशी करणार ? त्या अस्मान तुटलेल्या कड्यावरून ?

**शेलारमामा :** अरे तान्या, त्याच कड्याला घोरपड लावून दोर बांधा, आन् शिड्या सोडूनशान वांदरावानी जाऊं द्या समद्यांना झपाझप.

**तानाजी :** खरंच, हिरोजी, यशवंतीला आणि गुणवंतीला बरोबर घे आणि शिड्यांचे दोरही सूर्याजीला सांग, आणि मामा, आमच्याबरोबर तुमी बी टाका रिकबींत पाय, आणि उडवूं घोडे ते थेट कोंडाण्याच्या पायथ्याशीं.

**शेलारमामा :** संमद्यांनीं म्हणावं जिवाची आशा सोडून दुस्मनाला भिडा. परान् गेला तरी मागं परतूं नका. सवत्या सवत्या टोळ्यांनीं तुटून पडा.

**तानाजी :** हिरोजी, आतां उशीर नको. सूर्याजीला घेऊन तुम्ही पिछाडीला भिडा. आम्ही पहिल्याच धडाडीला उदयभानूची आघाडी उध्वस्त करतों कीं, तुमच्या मावळ्यांना पिछाडी उडवून कल्याण दरवाजानें आंत शिरतां येईल.

**शेलारमामा :** घाई करूं नका. अवसानानें दुस्मानाला अंगावर घ्या अन् घाला पासला.

*****************************************************

**हिरोजी :** मामा, आतां मागची काळजी सोडा आणि निर्धास्तपणं आघाडी लढवायच्या उद्योगाला लागा., मी आणि सूर्याजी आपल्या जिवाची शिकस्त करून कल्याण दरवाजानें आंत घुसतों आणि फडकवतों मराठ्यांचं भगवं निशाण.

**शेलारमामा :** चला, बोला हरहर महादेव.

## प्रवेश दुसरा

* * * * * * * * * * * * * * * *

[ रस्ता : सावजी—नेमाजी हत्यारबंद ]

**सावजी :** ऐकलंस गड्या, रायबा लगीन सोडून लडाईवर चाललायसा, तवां आपुन बी घेऊं या भवानीचं नांव आन् जाऊं या दनकत.

**नेमाजी :** म्यां पुन तेच म्हणतुंया. अक्षी मर्दावानी मरद आपुन, आन् लोक लडाईवर चालले असतां आपुन काय दाराआड दडून बसायचं व्हय ?

**सावजी :** आज समद्यांसंगं दुस्मनावर तुटून पडलों म्हंजी आस्ते आस्ते शिवाजीराजा बोलवील कीं आपल्याला.

**नमाजी :** आन् त्यांतबी आपुन ताज्या दमाचे गडी. दिसला दुस्मन गारद केल्याबिगर मागं न्हाई हटणार, असा आपला नूर—

**सावजी :** मग काय बी होईना, एकदा समशेर भाईर पडली का मंग ती रक्तानें न्हाल्याबिगर म्यान न्हाई होणार गड्या—

**नेमाजी :** पण लगीन सोडूनशान लढाईवर चाललेला आपला रायबा कुठ दिसत न्हाई ?

**सावजी :** आर, तोबी आपल्यासंगं बाणावानी दाखल होईल. आर, तानाजीरावांचं पिल्लु हाय तें, तें तसं थंड बसेल होय ? वाघावानी तुटून पडेल.

**नेमाजी :** आन् गड्या—इक्तं जमलेलं लगीन थंडावलं, पन त्या बेट्याला त्याचं सुकदुक हाय ? अक्षी समदा दिस हसतुया—

**सावजी :** आन् आज आपल्या बासंगं लढाईवरबी जातुया.

[ रायबा येतो.

**रायबा :** तयार झाले का दोस्त ?

**नेमाजी :** आरे आमी लई वाडुळ तुला हेरतुया. पन तूं कुठं ? तुज्यासाठीं आमी बी बनलों मरद आन् चाललों चकमक कराया—

**सावजी** : आमच्याबी मनानें घेतलं, पहिली लडाई आन् मागनं लगीन.

**रायबा** : आर लग्नाचं काय घेऊन बसलायसा. लडाई जितली म्हंजी बायकांना काय गेला तोटा ! फकत आपुन मरद गडी बनाया हुवं.

**नेमाजी** : आन् आपला तडाका दुस्मनाला दावाया हवा, म्हंजी कोन हवा तो आपली पोर बाईल म्हुन आपल्या गळ्यांत बांधील.

**सावजी** : आरे मनगटाची मर्दुमकी दावल्याबिगर आपल्याला कोन मरद म्हननार बी न्हाई.

**रायबा** : म्हुन सांगतुया मर्दावानी लडाई मारू या. आन् मागनं हासत बाईल घरामदी आनू या. [ सूर्याजी येतो.

**सूर्याजी** : तुमची तोंडाची वाफ आतां बंद ठेवा, आन् माझ्याबरोबर चला. तिकडे लडाई आतां सुरू होईल.

**सावजी** : सूर्याजीराव, आमी लडाई सामनी सामनी केली नसली तरी लडाईचं मैदान हेरून लई वखत आलुं या.

**नेमाजी** : दुस्मनावर नेम धरायचा तेवढा बाकी हाय बगा. म्हुन सांगतुंया, आजच्या हातघाईंत आमाला हात चालवाया वाव द्या.

**सावजी** : आन् मग बगा आमची करामत. बोलतां बोलतां दुस्मनाला न्हाई हात दावला, तर मी समजेन माज्या म्हाताऱ्याला लेकच न्हाई झाला.

**नेमाजी** : अव, आजच्या मर्दुमकीवर उंद्या आम्ही लग्नाची लडाई खेळणार. काय गड्या राया ?

**सावजी** : त्या उदयभानूला सांगूं या–के शेरके बच्चे आजाव मैदानमें.

**सूर्याजी** : तुम्ही मराठ्यांच्या पोटीं जन्मास आलेत इतकंच. अरे मूर्खांनो, देवानें तुम्हांला तोंड दिलं, तें असं वारेमाप बडबडायला नव्हे.

**नेमाजी** : पन् आमी म्हनतुया, आदुगर आमची कर्तबगारी बगा आन् आमच्या हातून कायबी घडलं न्हाई, म्हंजी आमचीं त्वांडं आन् तुमचा जोडा.

**सावजी** : मग आमी म्हनूं दैव आमचं.

**सूर्याजी** : दैवाला कशाला बोल लावतां ? तुमच्या कर्तबगारीचा दस्तुर पाहाण्यासाठींच मी तुम्हांला माझ्या दिमतीला घेतलं आहे.

**नेमाजी** : मग राव, बगाच आमची करामत. तुमच्या जोडीनें दुस्मनांच्या खांद्याला खांदा न्हाई भिडवला, तर ह्या मर्दांचं नांव सांगनारच न्हाई.

***********************************************

**सावजी :** रायाबी हाई आमच्या दिमतीला. जो जो गवसेल सामन्याला त्याला पुरा पल्याला पोचवूं या. आन् मग सांगूं तुम्हांला, बघा आमचा पराक्रम.

**रायबा :** काकांना तसं सांगून न्हाई जमणार गड्या. दुस्मनाच्या छातीला छाती भिडवली, आन् त्याची मुंडी ह्यांना दावली, म्हंजी मंग म्हणतील, हाय खरं मर्दाचं पानी —

**नेमाजी :** आन् त्यांत कोंडाण्यावरची हातघाई हाई ती; तिथं जरा अवसानानेंच बिलगाया होवं. हजाराच्या शिरगणतीनें पठाण रोहिला पारा करतुया —

**सावजी :** आन् म्हनत्यात चालून जायाला रस्ताबी न्हाई. अस्मान कड्यावरून वांचला, म्हंजी त्येला कोंडाणा दिसला.

**रायबा :** तेंबी सोपं न्हाई. वरचा गोफनीचा माराबी चुकवाया होवा. न्हाई तर आदुगर डोकसं फुटायचं.

**नेमाजी :** आरे शेराचा शेर तुजा बा हाय की. मग कशापायीं आपुन डरतुया.

**सावजी :** आन् सूर्याजीराव इसारा देतील. मग बगतुया लडाईची गंमत.

**सूर्याजी :** जिवाची गंमत सांभाळा आणि मग लडाईची गंमत बोला. तुमच्या तोंडाच्या तोफांऐवजीं दुस्मनाला मनगटाची मर्दुमकी दाखवा. चला —

**नेमाजी :** रायबा, तूंबी हायसच. समद्यांनींच जाऊं या हरहर महादेव बोलत.

**सावजी :** कीं दुस्मनाचा थरकांप झालाच.

## लावणी

**फडफडत शिवरायाचा, झेंडा मोलाचा, झाला शत्रूचा ॥**
**घाबरा ; जीव नाहीं जिवांत ॥ ध्रु० ॥ टपटपां घोडे धावत ॥**
**धडधडां तोफा उडत ॥ हरमहादेव गर्जत चालले वीर**
**चमकत, कोंडाणा गड घेयाला रे जी जी जी ॥**

## प्रवेश ३ रा

[ कोंडाणा : अस्वस्थ उदयभानू ]

**उदयभानू :** बोलतांना बेदरकारपणं बोलून गेलों, पण शेवटीं माझा मीच मूर्ख ठरलों. त्या दिवशींचा तो मौलवी सच्चा मौलवी नसून त्या दगाबाज लुटारू शिवाजीचा हेर असला पाहिजे, असा मला जबर वहीम येतो आहे. अहाहा ! माथ्याचा नुसता अंगार उडाला आहे. फाजील विश्वासानें ह्या बेवकूफ देवडीवाल्यांवर विश्वासून राहिलों, तों त्याचा फायदा शत्रूनें पहारेकऱ्याकडून असा घ्यावा ना ? आणि काय माझ्या मतीला भ्रम झाला तो माझ्या तोंडानें मी गडाची खडान् खडा माहिती त्या दगाबाजाला दिली. कोण आहे तिकडे ? [ एक अरब येतो. ] जाव, अबीके अबी दाऊदखानको बुलाव. [ तो जातो. ] शिवाजी ! शिवाजी ! ! काय त्याच्या नांवाची जादू आहे. मी दक्षिणेंत आल्यापासून माझ्या डोळ्यांना झोपसुद्धा नाहीं, असा सैतानासारखा हात धुऊन पाठीस लागला आहे.

[ दाऊदखान येतो.

**उदयभानू :** खानसाहेब, तुम्हांला एक गंभीर इशारा देण्याकरितां मीं बोलाविलं आहे.

**दाऊद० :** आणि आपल्यालाही मी सावध करण्याकरितांच आलों आहें.

**उदयभानू :** खानसाहेब, तुम्ही हाडाचे मुसलमान. हाडाच्या मुसलमानाला ओळखून काढतां आणि त्याच बतावणीनें आलेल्या दगाबाज दुश्मनाला ओळखूं शकत नाहीं ही मोठी शरमेची गोष्ट आहे. उदयभानू कोंडाण्याचा किल्लेदार म्हणून आलमगिराचा पायीक असला, तरी हाडाचा रजपूत आहे ! अर्थात् इस्लामियांच्या उपजत खाणाखुणा मला कितपत माहीत असणार ?

**दाऊदखान :** म्हणजे, पहारेकऱ्यांच्या ढिलाईनें दुश्मन गोटांत शिरला ? या अल्ला – तोबा तोबा......

**उदयभानू :** स्वतःचं शिर तळहातावर घेऊन ज्या मुसलमानांकरितां मी दुश्मनांच्या दारीं जाणूनबुजून आलों, त्याच मुसलमानांना भर दिवसा-ढवळ्या दुश्मनांच्या हेरानें धूळ चारून चालतं व्हावं ? खानसाहेब, उदयभानू लढाईच्या मैदानावर शेर का बच्चा असला, तरी अंतस्थ फितुरीला आपलेच मुसलमान बळी पडल्यानंतर तो काय करणार ?

**************************************************

**दाऊदखान :** नाहीं किल्लेदारसाहेब, ह्या बेजबाबदार देवडीवाल्यांना आणि टेहेळ्यांना शिस्तीचा कडक मामला सुनावल्याविना आपल्यासारख्या अधिकाऱ्यांना शांत झोप लागणार नाहीं.

**उदयभानू :** तुम्हांला माहीतच आहे, तुम्हां इस्लामियांची ताबेदारी पत्करून प्रत्यक्ष जातभाईंच्या हद्दींत तुमचा पायीक म्हणून आलों, अर्थात् मराठे दुश्मनांना उघड उघड आव्हान दिल्यासारखंच झालं आणि आज तोच दुश्मन प्रत्यक्ष माझ्याजवळ गडाचा भेद काढून सहीसलामत चालता झाला.

**दाऊदखान :** क्या ? आपला भेद काढून दुश्मन सहीसलामत निसटला ? मग आतां मात्र तो काफीर शिवाजी खात्रीनें दगा करणार.

**उदयभानू :** म्हणूनच सांगतों, डोळ्यांत तेल घालून तुम्ही जातीनें पहारेकऱ्यांवर नजर ठेवा आणि गडाची नाकेबंदी शिताफीनें रोखून धरा.

**दाऊदखान :** त्या बाबतींत निर्धास्त असा. दुश्मनांचा हेर भेद काढून सहीसलामत निसटून गेला असला, तरी गडाला गराडा देऊन गड ताब्यांत घेणं सोपं नाहीं आणि आलाच दुश्मन तर पठाण रोहिल्यांच्या पहिल्याच माऱ्यांत त्याला धूळ खात परत जावं लागेल.

**उदयभानू :** नाहीं खानसाहेब, देहानें दणकट पण बुद्धीनें हिणकस असलेल्या ह्या पठाणांवर आणि त्यांच्या कर्तबगारीवर विश्वास ठेवायला हा उदयभानू बिलकूल तयार नाहीं. हजारों पठाणांच्या पहाऱ्यांतून एक साधा चुव्वा सहज निसटून जावा ? धिक्कार असो ह्यांच्या नादानपणाला.

**दाऊदखान :** नाहीं किल्लेदारसाहेब. पठाणांना नादान समजून तुम्ही आपलं अवसान खर्चूं देऊं नका. फटाक्यांच्या शिक्षेनें एकेकाच्या माथ्यांतील सुस्ती उतरवतों आणि मग पाहातो दुश्मनाची दगाबाजी. [ आंत आवाज होतात. ] या अल्ला ! किल्लेदार !! खात्रीनें दगा—

**उदयभानू :** खानसाहेब, माझं दुष्ट स्वप्न सांगून पुरी घटकाही लोटली नसेल, तोंच ध्यानीमनीं नसलेला हा दावेदार सैतानासारखा अचानक आला. झालं, आला कीं नाहीं अनुभव ? आतां अगोदर वायुवेगानें घोडा दामटून दिंडीदरवाजावरील तोफांतून भडिमार सुरू करून, चारी बाजूनें मोर्चे उडवून एकच धुमाकूळ उडवा.

**दाऊदखान :** माझ्या जिवाची शिकस्त करून आणि पठाण रोहिल्यांना धीर देऊन मी दुश्मनाला रोखून धरतों. तुम्ही मागोमाग ताज्य दमाचे लोक घेऊन तयार असा.

**********************************************

**उदयभानू :** खानसाहेब, आतां कसला दम ? दुश्मनानें दावा साधायचा तो साधलाच. आम्यास आलमगिरासमोर उचललेला प्रतिज्ञेचा विडा फोल ठरला. जिवाच्या जिगरीनें दुश्मनाला भिडलों, तरी शिकंदर नशिबानें उलट खाली आहे.

**दाऊदखान :** नाहीं किल्लेदार, आपल्याला वाटते तितकी पहाऱ्यांत ढिलाई नाहीं आणि दुश्मनानें आरोळी मारली तरी आघाडीची फळी फुटलेली नाहीं. हत्तीच्या अवसानानें पठाण तुटून पडल्यानंतर दुश्मनाला सळो कीं पळो करून सोडतील. पठाण रोहिले तीन बाजूंना आपली अभेद्य फळी उभारून उभे आहेत आणि चौथा अस्मान कडा दुश्मनाला भीति घालतो आहे; म्हणून म्हणतों विजय आपला आहे. [ जातो. पुन्हा हरहर महादेव अशी गर्जना होते.

**उदयभानू :** ह्या उदयभानूला धूळ चारण्याविषयीं मनांत मांडे खाणाऱ्या सैताना, जोंपर्यंत उदयभानूच्या हातांत नंगी समशेर तळपते आहे, तोंपर्यंत कोंडाणाच काय, पण कोंडाण्याचा एक दगडही वाकडा करण्याचें सामर्थ्य तुम्हां दगाबाज दुश्मनांत नाहीं, हें खूप समजून असा. उदयभानूच्या रक्ताचा शेवटचा थेंब जमिनीवर सांडेल, तेव्हांच कोंडाण्यावर तुम्हां दगाबाज दुश्मनांचं भगवं निशाण फडकेल— [ जातो.

## प्रवेश चौथा

* * * * * * * * * * * * * * *

[ सावजी, नेमाजी व रायबा ]

**सावजी :** बग, बग, डोळे फाडूनशान नीट बग, आपले बापजादे जिवाची कदर न करतां आपली मर्दुमकी कसास लावत्यात. आन् आपुन खालीं तोंडाच्या गप्पांनीं गांव गाजवतुंया—

**नेमाजी :** गड्या, ह्यो अस्मान तुटलेला कडा हेरला, आन् मसनीं वाटलं, झक मारली आन् लडाईवर आलुं या. आतां बा परी, वाती जानार आन् वोंबलतांना हातबी जानार.

**रायबा :** आरे, आपल्या जातीच्या स्वाभिमानाची कदर धरा, देशाच्या उद्धाराची लाज बाळगा, आन् व्हा म्होरं !

**सावजी :** खरंच गड्या, मर्दापोटीं जन्माला येऊनशान् आज इभ्रतीला बिब्बा लागायची वेळ आलीया. त्यापरीस मेलों असतों तर ?

******************************************

**नेमाजी :** आरे, मरायचं कशापायीं लेका ? आपुन काय बांगड्या न्हाईना भरल्या ? आरे ही आपली झुंज घेयाची पहिलीच घडी हाई.

**सावजी :** हा समदा घोटाळा रायबाच्या लग्नानें केला. गड्या, तुज्या लग्नाचा बाजा वाजायची वेळ आली नसती म्हंजी आमच्याबी मनांत बायलेचं येड भरलं नसतं.

**नेमाजी :** आन् बायलेवानी जीव जगवायच्याबी भरीला पडलों नसतों. अगदीं वागावानी चालून गेलों असतों.

**रायबा :** आरे, आपल्या मायमाउलींची ज्या मुसलमानांनीं इटंबना मांडली होती, आयाबहिणींच्या अब्रूवर भर दिवसाढवळ्या दरोडा घालीत होते, त्या आपल्या दुस्मनांना दे माय धरणी ठाय म्हुनशानी जर्जर करणाऱ्या त्या पुण्यवान् शिवरायाचं स्मरान करा, आन् मारूं न्हाईतर इचिभन मरूं अशा चिडीनें दुस्मनावर तुटून पडा.

**सावजी :** गड्या राया, आज मला वाटतं, मर्दापोटीं जन्माला येऊनशान् पुरे नादान झालों असतों, पन तुझ्यावानी जिवाचा संवगडी धीर देयाला होता म्हुन ठीक. पन आज तुझ्या पायांची आन घेऊन सांगतों, आपल्या बाच्या नांवाला काळिमा लागेल असं कोणतंच वंगाळ काम न्हाई करणार.

**नेमाजी :** आन् म्यांबी तुज्या पायांची आन घेऊन समद्या मराठ्यांना सांगतुया, मर्दावानी जन्माला येऊन, बायलेवानी जगण्यापक्षी छातीचा कोट करून दुस्मनाला भिडूं या.

**रायबा :** आरे, मराठमर्दांचे बच्चे तुम्ही आन् आतां तुमास्नी शानपना सुचतुया व्हय ? आरे ती बगा अस्मानकड्यावर दोराची शिडी लावून आपले मावळे मरद वर चढूं लागले.

**सावजी :** मग आपुन काय त्येंचीं तोंडं बगायचीं व्हय ? तुज्यावानी नाईक आमच्या दिमतीला, आन् भवानीची कृपा आपल्या शिरावर, मग कशापायीं डरायचं ? जें काय व्हईल जिवाचं सोनं तां बी हतंच आतां—

**नेमाजी :** आन् राया, आतां सूर्याजीराव बी येईल. तवां तयारींतच न्हा. न्हाईतर समदं मुसळ केरांत जाईल.

**रायबा :** आरे आपुनबी पांकरावानी शिडीवरून जाऊं या. सूर्याजीकाका आन आपुन कल्याण दरवाजावर घुसूं या. आरे, आज आपली कसोटी हाई. काळाच्या छातीला छाती भिडवून त्याचे अक्काळविक्काळ दांत त्याच्या घशांत भरायचे हाईत.

************************************************

**सावजी :** आन् मरद मराठे म्हुनशान आपल्याला मोटेपनाची मिळवायचा हाई. तुज्या बानें शिवरायाच्या आज्ञेम्होरं जिवाची कदर केली न्हाई म्हुनशान् शिवरायाचा तुज्या बासाठीं तीळ तीळ जीव तुटतुया.

**नेमाजी :** आन् म्हनुनच समदं मराटे त्यासनी वचकत्यात. आतां बगा हां हां म्हनतां शिडी चढूं या. आपल्या अमदानींतली अव्वल झुंज हाई ही गड्या.

**सावजी :** ह्यांतून सहीसलामत बचावलों, तर मग म्होरची वार्ता — र्‍ये बगा समदे गडी अक्षी शिडी चडुनशानी वर गेलेया.

**नेमाजी :** चल राया — हो म्होरं आन् चाल बिगीबिगी ; कोंडाण्याच्या कड्यावर कड्यावर आपल्या मर्दाईची निशाणी तरी लावूं या —

**रायबा :** आरे आपुन मरद बच्चे, निशाण लावुनशान शिवरायाच्या मुजऱ्याला जाऊं या. चला झालीच इशारत. [ जातात.

## प्रवेश पांचवा

* * * * * * * * * * * * * *

[ कोंडाणा : उदयभानू सशस्त्र ]

**उदयभानू :** दगाबाज काफर, जिवाची शिकस्त करून खांद्याला खांदा भिडविलात, तरी अखेर तुमचीं शिरं ह्या उदयभानू पुढें उतरून ठेवावीं लागतील. [ आंत हरहर महादेव गर्जना ] अरेरे, दुश्मन दाराला भिडला, आणि ह्या कडव्या पठाणांचा दिमाख ऐन कसोटीच्या वेळीं मातीमोल कसा झाला ? या, प्रतिज्ञेचा बेलभंडार उचलून, कोंडाण्यावर मराठ्यांचं भगवं निशाण फडकविण्याची दुर्दम्य आशा धरणाऱ्या नामर्द भेकडांनो, या, उदयभानूसमोर या, तुमच्या देहाचीं खांडोळीं करून माझ्या मर्दुमकीचं हिरवं निशाण नाचवायला हा उदयभानू तुमच्यापुढें खंबीर उभा आहे.

[ तानाजी येतो. गर्जना होते.

**तानाजी :** इस्लामियांच्या हिरव्या निशाणाचा क्षुद्र अभिमान धरून परकीयांच्या दारांत ओशाळ्या भाकरीचे तुकडे मोडणाऱ्या नादाना, मराठ्यांच्या मर्दुमकीचा भगवा बावटा घेऊन हा वीर तानाजी तुझ्या रक्तानें आपली समशेर लाल करण्याकरितां तुझ्यासमोर आला आहे.

**उदयभानू :** कोण तानाजी ? हं; जातगोताची पर्वा न करितां, प्रत्यक्ष दुश्मनाच्या छातीवर नाचण्याकरितां, जो बेडरपणें दक्षिणेंत तळ देऊन

**************************************** **********

बसला, तो हा उदयभानू आपली समशेर तुझ्या समाचारासाठीं सरसावून सज्ज आहे.

**तानाजी :** परधर्मीयापुढें भिकेच्या अन्नासाठीं मान नमवून अभिमानी रजपुताच्या बाण्याला काळिमा लावणारा तूं बाटगा, तुझ्या समशेरीला समशेर भिडवून महाराष्ट्र मराठ्यांचा आहे, जुलूमजबरदस्तीनें महाराष्ट्र मारला जाणार नाहीं, हें सिद्ध करण्याकरितांच हा तानाजी तडक तुझ्यासमोर आला आहे.

**उदयभानू :** बेसावध दुश्मनावर झडप घालणारा तूं काफर, तुझी कारवाई न जाणण्याइतका हा उदयभानू दूधखुळा नाहीं. उदयभानू अस्सल मर्द आहे आणि शेवटपर्यंत तो आपल्या समशेरीचं पाणीं दुश्मनांना दाखविणार.

**तानाजी :** देशधर्माच्या स्वाभिमानाचं पाणी ज्याच्या तोंडावर चमकत नाहीं, असला कुलांगार, दिवटा, आपल्या समशेरीचं पाणी दुश्मनाला काय दाखविणार तें दिसतंच आहे. चल, इस्लामियांच्या सत्तेसाठीं जातधर्म सोडून लाजअब्रु गुंडाळून झुंझणाऱ्या धर्मद्रोह्या, मरायला तयार हो.

[ लढतात. गर्जना होतात.

**उदयभानू :** [ तानाजीवर वार करून ] गनिमी गुंगाऱ्यानें मुसलमानांना त्राहि भगवन् करून सोडणाऱ्या मावळटा— [ तानाजी पडतो.

**सूर्याजी :** [ आंतून ] शाबास बहाद्दर मावळ्यांनो, शाबास. चालवा समशेरी, सरसावा भाले आणि मराठ्यांच्या मनगटांतील मर्दुमकी दुश्मनाला दाखवून तुमचा दरारा कायम राखा. बोला हरहर महादेव.

**उदयभानू :** अरेरे, हा कोण दुसरा काफर ? उदयभानूच्या रक्तानें आपली समशेर लाल करणाऱ्या मावळटा—

[ लाथ मारायला जातो, तोंच शेलारमामा येतो.

**शेलारमामा :** हां खबरदार. नादान, हट् मागं. मेल्या मुड्याला लाथ ? मुसलमानांच्या उष्ट्या अन्नानें माजलेल्या मगरुरा, माझ्या तान्याला लाथ ?

**उदयभानू :** हो, हो, तुझ्या तान्याला लाथ. तान्याच्या अभिमानानें चवताळलेल्या थेरड्या, तुझीसुद्धा अवस्था तुझ्या तान्याप्रमाणें होणार आहे.

**शेलारमामा :** अरे, बाटग्या भेकडा, ह्या शेलारानें काळ्याचे पांढरे केले, ते तुझ्यावानी माजवान मांगांच्या मुंड्या मारूनच केले हाईत. ह्या

***************************************************

थेरड्याच्या तडफेची तुला जानीव नसल, पन पहिल्याच वाराला तुजी उद्दाम लाथ बाजूला उतरून दुसऱ्या वाराला तुला यमाचा दरबार दावतुया.

**उदयभानू :** [ विकट हास्य करून ] समशेर पेलायची ज्याला ताकद नाहीं, तो हा झुकताड थेरडा ह्या बहाद्दर भानूला यमाचा दरबार दाखविणार !

[ लढतात. उदयभानू पडतो.

**शेलारमामा :** माजोरी बाटग्या, हा शेलार त्या लाथेचं उसनंच फेडून घेण्यासाठीं आला हाई.

**उदयभानू :** दगा – दगा.

**शेलारमामा :** मेल्या मुडद्यावर निर्दयावानी लाथ मारणाऱ्या बाटग्या धर्मभ्रष्टा, मर, तडफडून मर. [ तानाजीचें डोकें मांडीवर घेऊन ] तान्या, लेका काय केलंय हें ? इत्का बेभान होऊनशान् आपल्या कच्चाबच्चांना कसा रे अंतरलास ? इत्की घाई कशासाठीं केलीया ? लेका तान्या, तुज्यापरिस म्या मेलों असतों, तर तुम्हां भाच्यांकडून माज्या जिवाचं सोनं झालं असतं. आतां पागोळींत पाऊल टाकतांच तुझ्या बायलेनं इचारलं माझे धनी कुठं हाईत, म्हंजी त्या तुज्या लक्ष्मीला काय रे उत्तर देऊं ?

[ डोकें ठेवून पडतो.

[ पुढील रस्त्याचा पडदा पडतो, तोंच मावळे धावत येतात.
दुसऱ्या बाजूनें बेफाम झालेला सूर्याजी त्यांना अडवतो. ]

**सूर्याजी :** पळा, कुलांगार दिवट्यांनो, अस्सल मराठ्यांच्या पोटीं जन्मास येऊन, आपल्या पूर्वजांना रौरवाचं साधन करण्यासाठीं शिवरायाच्या कीर्तीला कलंक लावण्यासाठीं असेच पळा —

**नेमाजी :** सरदार, पळूं नको तर काय करूं ? मराठ्यांचा मोहरा, महाराष्ट्राचा मोती पडला......

**सावजी :** पठाणांनीं सारखी कत्तल चालविली हाई. तानाजीराव पडले — मग आम्ही काय करणार ?

**सूर्याजी :** हें काळं तोंड घेऊन तुमच्या विश्वासावर बसलेल्या त्या शिवरायाला दाखवणार ? आजपर्यंत जो काळिमा मराठ्यांनीं लावून घेतला नाहीं, तो काळिमा तुम्ही लावून आत्तांपर्यंतच्या विमल कीर्तीवर बिब्बा घालणार ?

********** **********************************

**नेमाजी :** न्हाई, आतां प्राण गेला तरीबी पळणार न्हाई. ज्या आमच्या नायकाचं सोनं झालं त्याच्या पायाशीं आमी बी सोनं करणार.

**सूर्याजी :** तानाजीदादाचा सूड म्हणून पठाणावर तुटून पडा. तुमच्या नाइकाचं प्रेत दुश्मनाच्या हद्दींत पडलं असतां तुम्ही पळून तुमच्या धन्याला दुश्मनाकरवीं कोल्ह्याकुत्र्यांपुढं फेकून देववणार ना? मग असलं लाजिरवाणं जिणं जगण्यापेक्षां रणांगणांत दुश्मनांशीं झुंजतांना मेलेत तर मोक्ष तरी मिळेल.

**सावजी :** सरदारसाहेब, आतां तानाजीरावांचा सूड. बस. मग जीव जावो अथवा राहो.

**सूर्याजी :** मराठे वीर दुश्मनाला पळायला लावतात आणि आज मर्दांपोटीं जन्मास येऊन तुम्ही पळतां? आणि पळालेत तरी जाणार कुठं? कड्यावरील दोराची शिडी मी केव्हांच उडवून दिली आहे. चला, फिरा मागें आणि हरहर महादेवाच्या घोषांत दुश्मनाला जमीनदोस्त करा.

**नेमाजी :** आतां मारूं, तवांच हें त्वांड तुम्हांला दावूं. सावजी, ज्या माउलीची कूस शिणविली, ज्या बापाचं नांव लावलं, त्याचं नांव राखूं या.

**सूर्याजी :** दुश्मनाला भिडलेला मराठा सोक्ष अथवा मोक्ष करून घेतल्याविना सुटत नसतो. [ हिरोजी येतो.

**हिरोजी :** सूर्याजी, पाहातोस काय? उदयभानू गारद झाला. शिताफीनें कल्याणदरवाजांत घुसून तटावर निशाण लाव, गवताच्या गंजीला आग लाव आणि महाराजांना गड सर झाल्याचा इषारा दे. बेहत्तर आहे प्राण गेला तर. एक मोहरा गेला तिथें दुसरा मोती जाईल, पण कसूर करूं नको. मी त्या दाऊदखानाला झोपवून आलोंच. चला धावा —

**सूर्याजी :** हिरोजी, ह्या सूर्याजीनें छातीचा कोट करून मराठ्यांचं भगवं निशाण लावलंच म्हणून समजा.

---

नों. १५
वाचनालय

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

* * * * * * * * * * * * * *

[ तानाजी–उदयभानूंचीं प्रेतें शेजारीं शेजारीं पडलीं आहेत. हिरोजी येतो. ]

**हिरोजी :** अहाहा ! कुलस्वामी शंभुदेवा, काय केलंस हें ? जिजामाउलीच्या इच्छेसाठीं ज्यानें लेकाचं लग्न लाथाडून धन्याच्या मर्जीसाठीं कोंडाण्यावर चाल केली, तो हा वीरमणी, मराठ्यांचा रणझुंजार, आपल्या आतेष्टांना, देशबांधवांना, मायभगिनींना, शिवरायाला सोडून कैलासांत तुझ्या पदरीं चालता व्हावा ना ? आज हा मोलाचा मोती कोंडाण्याच्या प्राप्तीसाठीं कामास आलेला ऐकून, सारा महाराष्ट्र दुःखानें धायीं धायीं रडेल. शिवरायाला अन्न गोड लागणार नाहीं कीं ह्यापुढें सुखाची झोंप लागणार नाहीं. कोंडाण्यावर निशाण लागलेलं पाहून, रायाच्या लग्नासाठीं अधीर झालेल्या त्याच्या माउलीला स्वतःच्या धन्यानें जिवाचं सोनं केलेलं ऐकून विष खाऊन प्राण द्यावासा वाटेल. [ शेलारमामा येतो. ] मामा, काय झालं हो हें ? आतां महाराजांना आपण तोंड कसं दाखवायचं ?

**शेलारमामा :** हिरोजी, आजच्या वखताला कायत्री अपशकून होणार असं मला सपनच पडलं होतं. यशवंतीला पुजून तिला तान्यानें कड्यावर लावतांच घोरपड खालीं आली तवांच म्यां जानलं कीं, कांहीं तरी अपशकून हाई. घाई केली तिथंच पोर फसला.

**हिरोजी :** मामा, आतां सूर्याजी ह्यांच्या पायाशीं आपलं कपाळ फोडून आक्रोश करील. ज्या मांडवाला मंगलकार्याचीं पवित्र केळींचीं तोरणं लावलीं आहेत, त्या ठिकाणीं स्मशानवत् भीषणता पसरून भेसूर रडारड सुरू होईल.

[ सूर्याजी येतो. तानाचीच्या प्रेताला कवटाळतो.

**सूर्याजी :** दादा, दादा काय केलंत हें ? असा आमच्या हातून काय अपराध घडला, म्हणून आम्हांला कुणालाही न सांगतां, तुम्ही रागारागानें स्वर्गानंद लुटायला चालते झालांत ?

**हिरोजी :** सूर्याजी, खरे जवानमर्द, खरे राष्ट्रप्रेमी, खरे स्वामिनिष्ठ तुझे दादा, पण आज त्यांना देवानें, आपणां सर्वांपासून जबरदस्तीनें हिरावून आपल्याकडे नेलं. होणं जाणं हें भगवंताच्या मर्जीवर अवलंबून आहे. तिथं आपण काय करणार ?

******************************************

**शेलारमामा :** स्वामिनिष्ठा, देशप्रेमाची जागती ज्योत म्हंजी माजा तान्या, पन कुणा दुस्मनाची नजर लागली, आन् माजा सोन्यावानी पोर आमां समद्यांना धायी धायी रडाया लावून पुटकन् नजरेआड झाला.

**सूर्याजी :** मामा, ह्या सूर्याजीवर संकटाचं आकाश फाटलं. माझ्या चौसुपी घराचा धारण कोसळला. माझ्या जिवावर आपल्या छायेची सांवली करणारा कल्पवृक्ष मुळापासून उपटून पडला. माझ्या आयुष्यांतील आशेचा मनोरा ढांसळला.

**शेलारमामा :** सूर्या, पोरा, अशीं घळाघळा आसवं काढून ह्या म्हाताऱ्याच्या काळजाचं पानी करूं नको. संकटाचे आघात रामाकिरिसनांना चुकले न्हाईत, हरिच्चिदरासारखा राजा, पन त्याच्याबी कपाळींचे भोग सुटले न्हाईत, तवां आपली पाप्यांची काय गोष्ट थतं ?

**हिरोजी :** अखिल विश्वाचा त्राता भगवान् त्यालासुद्धा संकटाच्या परंपरा सोसाव्या लागल्या. म्हणून म्हणतों तुझे दादा देहरूपानें आपल्यांतून अदृश्य झाले असले, तरी कीर्तिरूपानें ते कल्पांतापर्यंत अमर होऊन राहिले आहेत.

**शेलारमामा :** धन्यासाठीं जिवाचं सोनं करूनशानी, म्होरल्या पिढीला मोलाचा धडा घालून दिला हाई.

**सूर्याजी :** मामा, हिरोजी, माझे दादा इकडे येतांना, आपल्या कच्चाबच्चांना, बायकामाणसांना कायमचे अंतरतील, असं कुणाच्या स्वप्नांत तरी आलं होतं का हो ? मामा, माझे रणधुरंधर धाडसी दादा आजपर्यंतच्या लढायांत दुश्मनांना कंठस्नान घालून, मोठ्या अभिमानानें शिवरायाला मुजरा करीत असत...पण आज —

**हिरोजी :** पण आज, राजे किल्ला सर झाला ह्या आनंदांत इकडे आले नि त्यांना त्यांचा जिवाचा जिगरदोस्त दिसला नाहीं, म्हणजे महाराज वेडेपिसे होतील. कोंडाण्याचा तट सर करतांना आपल्या पंचप्राण तानाजीच्या प्राणांचा बुरुज ढांसळला म्हणून तो महात्मा घळघळ आसवं काढील.

**शेलारमामा :** हितं आल्यावर, कोंडाण्यावर मराठ्यांचा झेंडा फडकविण्यासाठीं मावळ्यांनीं पराण सोडलेले पाहूनशान, त्या माझ्या रायाला काय दुःख होईल !

**सूर्याजी :** माझ्या दादांच्या वास्तव्यानें गजबजलेलं घर, मी घरीं जातांच ह्या दुर्भागी सूर्याजीला एकदम खायला येईल. जिकडे तिकडे

********** ****************************************

स्मशानाची शांतता पसरेल आणि ह्या सूर्याजीला जहर खाऊन जीव द्यावा असं होईल.

**हिरोजी :** सूर्याजी, तुझ्यासारखा पाठीराखा विश्वासू भाऊ होता, म्हणून तुझे दादा निष्काळजीपणानं चालते झाले. त्यांच्या मागं त्यांच्या कुटुंबपरिवाराची सर्व जबाबदारी आतां तुझ्यावरच आहे. पित्याच्या मायेनें तुझ्या दादाचीं चिमणीं चिलींपिलीं तुला हांका मारतील, पाठीवर पाय देऊन आलेल्या भावाप्रमाणं, तुझी वहिनी तुझ्या तोंडाकडे पाहील.

**सूर्याजी :** माझी वहिनी, मामा, हिरोजी, कोंडाणा सर झाला, म्हणून विजयानंदानें हातीं पंचारती घेऊन, दादांना दारांत सामोऱ्या येणाऱ्या माझ्या वहिनीला, दादा आले नाहींत, दादा आपणां सर्वांना सोडून देवलोकीं निघून गेले, म्हणून कुठल्या तोंडानें सांगूं ? काका, बाबा कुठं आहेत म्हणून त्या चिमण्या जिवांनीं किलकिल करायला सुरुवात केली कीं, कोणत्या मायेच्या पंखाखालीं घेऊन त्यांना समाधानाची ऊब देऊं ?

**हिरोजी :** सूर्याजी, तुझ्यावरील तो अकाळविकाळ प्रसंग, माझ्या डोळ्यांसमोर आतांपासूनच उभा राहिला आहे. पण करणार काय ? प्राक्तनाच्या पापी फेऱ्यांना गंभीरपणानें आतां नको का तोंड द्यायला ? एकशेंएक कौरवांचा पाडाव कुरुक्षेत्रावर झाला, ही गोष्ट गांधारी–धृतराष्ट्राला समजल्यानंतर, त्यांनीं काय केलं असेल ? दादांना वीराचं मरण आलं, त्या दृष्टीनें आज तुझ्या दादाचं सोनंच सोनं झालं आहे. म्हणून म्हणतों धीर धर.

**सूर्याजी :** माझ्या आयुष्याचा सर्वस्वी धीर सुटल्यानंतर ? माझ्या जीवननौकेचा नावाडी नीलकंठाच्या सन्निध गेल्यानंतर ह्या केविलवाण्या तोंडानें आतां कोणाच्या तोंडाकडं पाहूं ? हिरोजी, माझा दादा गेला, पण ह्या सूर्याजीची दादपूस आतां कोणी करणार नाहीं. कपाळीं भरलेला मळवट कोंडाण्यासाठीं पुसायची वेळ आली, माझीं मुलंबाळं उघडीं पडलीं, मग तुम्हीं पाठीवर पाय देऊन आलेले माझ्या धन्याचे पाठीराखे काय करीत होतां म्हणून वहिनीनें विचारलं, म्हणजे तिच्या पेटत्या हृदयाचं कोणत्या बोलांनीं समाधान करूं ?

**शेलारमामा :** पोरा, आतां कसलं समाधान करतुयास ? पोरीच्या कपाळीचा भरला मळवट पुसला गेला, त्याला तूं अन् म्यां काय करणार ?

**********************************************

**सूर्याजी :** राजा, मराठ्यांच्या हांकेला मध्यानीं हांक देणाऱ्या मायबापा, आतां काय करूं ?

[ इतक्यांत शिवाजी येतो, परंतु गंभीर वातावरण पाहून दचकतो.

**शेलारमामा :** ये, दीनदुबळ्यांच्या दयाघना, मराठ्यांच्या राया, ये. भवानीआई तुला उदंड आयुक्षाचा करो, आन् आमां मराठ्यांच्या कापाळीं पिढ्यान् पिढ्या लागलेली रड न्हाईशी होवो. शिवबा— [ पाय धरतो.

**शिवाजी :** मामा, कोंडाणा सर झाल्याबद्दल आनंदाची इशारत दिलीत, मग मी येतांच प्रेमानें स्वागत करण्याऐवजीं तुम्ही सगळेजण अशा रोदनस्वरांनीं, ह्या माझ्या हृदयाला कां धक्का देतां ! मामा, बोला, काय झालें तें ह्या तुमच्या लाडक्या शिवबाला सांगा.

**सूर्याजी :** [ पाय धरून ] राजा, कोंडाणा किल्ला सर झाला पण तुझ्या गळ्यांतला ताईत, जिगरदोस्त, महाराष्ट्राचा मोहरा, मोलाचा मोती हरवला.

**शेलारमामा :** कोंडाण्याच्या तटावर टकरा मारतांना तुझ्या तान्याच्या छातीचा कोट ढांसळला.

**शिवाजी :** काय ? माझा तानाजी पडला ? मोलाचं माणिक मातीमोल झालं ? महाराष्ट्राला शौर्याची, स्वामिनिष्ठेची आणि कर्तव्याची अखंड चेतना देणारा, माझ्या हृदयाचा तेजस्वी तारा तुटला ? अरेरे ! तानाजी, बहाद्दर रणगाजी, मासाहेबांच्या इच्छेसाठीं तुला तुझ्या लाडक्या रायाचं लग्न सोडून इकडे यावं लागलं, म्हणूनच का या शिवाजीवर आणि शिवाजीबरोबर सगळ्या महाराष्ट्रावर तुझी इतराजी झाली ? बोल, आजपर्यंत अनेक मराठे मायबहिणींच्या कपाळींचे मळवट टिकविण्यासाठीं तुला तुझ्या जिवाचं रान करावं लागलं, म्हणूनच का स्वतःच्या घरधनिणीला महाराष्ट्राच्या हितासाठीं स्वतःच्या कपाळींचा मळवट पुसायचं भयंकर दिव्य करायला लावलंस ? बोल, तानाजी, आजमितीपर्यंत ह्या हतभागी शिवाजी-समोर अभिमानानें उच्चारलेले बोल, पावलागणिक खरे करून आज तुझ्या लाडक्या लेकाच्या लग्नाचा बोल माझ्यावर ठेवून तूं कां गेलास ? मामा...हिरोजी...

**शेलारमामा :** माझ्या शिवरायाच्या आज्ञेपुढं मला ह्या जगांत काईबी नको, माझं बरं वाईट माज्या शिवरायाच्या जिवासाठींच होऊं दे, असं सांगतांना त्याचे डोळे भरून आले नि ‘ राजा राजा ’ म्हुनशान् परान सोडले.

**शिवाजी :** अरेरे ! विजयी म्हणून मला मोठ्या दिमाखानें मुजरा करायला येतांच ज्याला डोळे भरून पाहाण्यांतच ह्या शिवाजीला स्वर्गसुखाचा आनंद होत असे, त्या ह्या तानाजीनें केवळ माझ्यासाठीं, माझी कामगिरी बजावून स्वतःचे पाणीदार डोळे कायमचे मिटलेले पाहून, मला सारा महाराष्ट्र काय म्हणेल ? ज्यानें माझ्यासाठीं आनंदानें कायमचे डोळे मिटले, त्याला शेवटच्या घडीला ह्या शिवाजीला डोळे भरून पाहाण्याचं सुख लाभूं नये ? मामा, कोंडाणा मासाहेबांना मिळाला. पण तो मिळविणारा माझा तानाजी, ह्या कोंडाण्याच्या निमित्तानें महाराष्ट्रीयांच्या मनांत चिरंजीव होऊन राहिला.

**हिरोजी :** कर्तव्यापुढें मायाबंधनाचे पाश ज्यानें तुच्छ मानले, शिवरायाच्या मर्जीसाठीं ज्यानें रात्रीचे दिवस केले तो नरवीर मरतां मरतांही सर्वांना अमर आठवण ठेवून चालता झाला.

**शिवाजी :** मामा, सूर्याजी, हिरोजी, माझा कलिजा, महाराष्ट्रवीरमालिकेंतील एक मौल्यवान मणी, आज अचानक गळला. मामा, झाल्या गोष्टीबद्दल आतां आपण कितीही दुःख करीत बसलों, तरी माझ्या काळजाचा एक कातळा गेला, तो कायमचाच गेला. मामा, केवळ कर्तव्याकरितां आज तानाजीला जें भयंकर दिव्य करावं लागलं, तेंच दिव्य उद्यां तुम्हां आम्हांलाही करावं लागणार. आजपर्यंत हा शिवाजी ध्येयासाठीं झगडला आणि माझ्या ध्येयपूर्ततेसाठीं, माझ्या जिवाला जीव देणाऱ्या मावळ मराठ्यांनींही आपला शब्द जिवापलीकडे सांभाळला. माझा तानाजी गेला खराच, पण जातांना तो तुम्हां आम्हांला, नव्हे, सबंध महाराष्ट्राला एक मोलाची शिकवण देऊन गेला कीं, कर्तव्यासाठीं जगा आणि आलीच वेळ तर कर्तव्यपालनासाठींच आपल्या प्राणांचें अमोल दान करा.

**शेलारमामा :** शिवबा, खरं हाई तुजं म्हननं. तान्या बिचारा मरून गेला. पन मरतांना समद्या मराठ्यांना सांगून गेला, मी केलं तें काईबी न्हाई, तुमी शिवबासाठीं माज्यापक्सी जास्त करून दावा.

**शिवाजी :** मामा, मराठेशाहीचं मंदिर उभारण्याच्या भगीरथ प्रयत्नांत शिवाजीला, स्वतःच्या जिवाचं अग्निदिव्य करणारा हा दुसरा प्राणी भेटला. पहिला पावनखिंडींत आपल्या प्रतापाची शिकस्त करून चालता झाला, दुसरा कोंडाण्यावर अमर होऊन राहिला. मामा, गड आला, पण माझा सिंह गेला, म्हणून माझ्या तानाजीच्या पुण्यस्मरणार्थ कोंडाण्याचं नांव

# गडाखालीं

मराठी वाचकांना श्री. परचुरे ह्यांचा परिचय नव्यानें करून देण्याची आवश्यकता नाहीं. 'जातिवंत जवान' हें त्यांचें पहिलेंच नाटक वाङ्मयाच्या व प्रयोगाच्या दृष्टीनें यशस्वी झालें. खास मुलींसाठीं लिहिलेलें 'मैत्रिणी' हें प्रहसनही लोकप्रिय ठरलें. आणि त्यानंतरचें 'मुलांचे तात्याराव सावरकर' हें त्यांचें पुस्तक तर चांगलेंच गाजलें. पण मुलांप्रमाणेंच मोठ्यांनाही प्रिय झालेलें तें पुस्तक सरकारच्या मात्र अवकृपेला पात्र झालें! 'सिंहगड' ही प्रस्तुत नाटिका श्री. परचुरे ह्यांची चौथी वाङ्मयाकृति होय.

श्रीशिवाजीमहाराजांप्रमाणेंच शौर्यशाली म्हणून इतिहासांत अजरामर झालेला नरवीर! घोरपडीच्या साहाय्यानें सिंहगड सर करणारा वीरसिंह तानाजी मालुसरे! त्या वीर पुरुषाची आबालवृद्धांना सुपरिचित अशी उज्ज्वल चारित्र्यकथा भावी पिढीसाठीं नाट्यरूपानें सजविण्यांत चालू देशकाल-परिस्थितींत श्री. परचुरे ह्यांनीं मोठेंच औचित्य साधलें असून त्याबद्दल त्यांना द्यावेत तेवढे धन्यवाद थोडेच आहेत.

आधुनिक नाट्यतंत्राच्या अवडंबराचा मोह टाळून जुना विषय परिणाम-कारक नावीन्यानें नटवितांना श्री. परचुरे ह्यांनीं जुन्याच नाट्यतंत्राचा अवलंब केला, हें योग्यच झालें. शिवाय, मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ही सिंहगड नाटिका स्त्रीपात्रविरहित आहे! हृदयस्पर्शी कथानक, भावनोत्कट प्रसंग, रेखीव मांडणी, प्रसंगोचित डौलदार भाषा, सहजरम्य विनोद, इत्यादि गुणविशेषांमुळें प्रस्तुत नाटिका मनोरंजक व उद्बोधक झाली आहे. बालवाङ्मयाच्या सृष्टींत तर हा 'सिंहगड' आपल्या वैशिष्ट्यानें अखंड झळकेलच. पण शाळेच्या जगांतही तो प्रयोगदृष्ट्या अत्यंत यशस्वीपणें तळपेल ह्यांत शंका नाहीं. आजच्या काळांत स्वातंत्र्यप्रेमानें ओथंबलेल्या, वीररसानें रसरसलेल्या 'सिंहगड' सारख्या नाटिकांचें मोल फार आहे. उत्सवसंमेलनप्रसंगीं छोटीं मोठीं नाटकें करण्याची प्रथा पडली आहे. तरी त्या प्रसंगीं कसल्या तरी नीरस नाट्यसंवादांपेक्षां 'सिंहगड' सारख्या चटकदार, स्फूर्तिप्रद नाटकांचेच प्रयोग करणें अधिक श्रेयस्कर ठरेल.

मराठ्यांच्या तेजस्वी इतिहासांतील असेच आणखी कांहीं रोमहर्षण प्रसंग मुलांसाठीं नाट्यरूपानें श्री. परचुरे सजवितील अशी मला आशा आहे.

इत्यलम्! 'सिंहगड'–दर्शनासाठीं उत्सुक झालेल्यांना गडाखालींच फार वेळ ताटकळत ठेवणें बरें नव्हे.

ताराबाग, मुंबई नं. ४, ता. १२–१०–१९४२ **सदाशिव अनन्त शुक्ल**

प्रवेशद्वारांत

वास्तविक "सिंहगड" हें नाटक महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध लेखक नि सिने–आर्टिस्ट कै. न. दा. सरपोतदार ह्यांच्या कसलेल्या कलमांतून बाहेर पडायचें. परंतु कै. सरपोतदार ह्यांच्या अकालीं निधनामुळें सोडलेला संकल्प सिद्धीला गेला नाहीं नि महाराष्ट्रांतील मुलांना एका चांगल्या नाटकाला मुकावें लागलें.

माझें शिक्षण, इतिहासाचा अभ्यास नि वाङ्मय-व्यासंग अत्यंत अल्प आहे ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. पण एक लहानसा प्रयत्न नि नाट्यकलेविषयीं आस्था म्हणूनच हें नाटक लिहिण्याचें धाडस मी करीत आहें. शाळांतील 'अध्यापकवर्गानें व विद्यार्थीबंधूंनीं ह्या नाटकाचे प्रयोग शाळेच्या सम्मेलन-समारंभांतून करून मला प्रोत्साहन द्यावें म्हणजे कै. सरपोतदारांनीं संकल्पिलेलें पण अपुरें राहिलेलें काम अल्पांशानें तरी माझ्या हातून पार पडल्याचें सात्त्विक समाधान माझ्या मनाला मिळेल. कै. सरपोतदारांच्या लिखाणाची लज्जत माझ्या मजकुराला कशी यावी? कुठें इंद्राचा ऐरावत नि कुठें श्यामभटाची तट्टाणी!

महाराष्ट्राचे आवडते नाटककार नि नामवंत कवि श्री. स. अ. शुक्ल ऊर्फ कुमुदबांधव ह्यांनीं आपली 'वीरवंदन' ही कविता माझ्या पुस्तकांत छापण्याची परवानगी दिली नि प्रस्तावनारूपानें माझ्या पुस्तकाचा पुरस्कार केला ह्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

माझ्या मागील पुस्तकांप्रमाणेंच ह्याही पुस्तकाचें यथोचित स्वागत वाचकांकडून केलें जाईल अशी मला आशा आहे.

गोरेगांवकरांची चाळ, क्रमांक २,
गिरगांव, मुंबई क्रमांक ४, १०-१०-४२

**गजानन पांडुरंग परचुरे**

IRBK-0106240

IRBK-0106240